


म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. क्र. ५८०९


# प्रवास आणि निःश्वास

— भास्कर गोळे




REFBK-0021600
REFBK-0021600

भू. प्रवास
५८१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुमार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 MAY 1977

4 DEC 1977

23 JAN 1983

[ क्र. मा. प. ]

# प्रवास आणि निःश्वास

२१६०० संदर्भ २८।३।७५ भू-प्रवा ५८०

वहिनी प्रकाशन : ५

*

*

# प्रवास आणि निःश्वास

भास्कर गोळे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५८०
२१६००
REFBK-0021600
REFBK-0021600

*

*

*

प्रकाशक : भास्कर गोळे
सौ. लीला भा. गोळे
वहिनी प्रकाशन,
८०० अ, सदाशिव पेठ,
पुणे ३०.

✠

प्रथमावृत्ती : गणेशचतुर्थी
२९ ऑगस्ट '७६

✠

© भास्कर गोळे

✠

मुखपृष्ठ : जी. भास्करन्

✠

मूल्य : पाच रुपये

✠

या पुस्तकासाठी सरकारी
कागद वापरला आहे.

✠

मुद्रक : पु. कों. कामठे
नवनाथ मुद्रणालय,
६८१ शुक्रवार पेठ,
पुणे ३०.

रसिक संपादक

कै. अनंत अंतरकर यांना—

—समर्पण

# लेखकाचे निवेदन–

आजपर्यंत प्रवासवर्णनपर अनेक पुस्तके लिहिली गेलेली आहेत. त्या पुस्तकांत निरनिराळ्या स्थळांचे, मंदिरांचे, प्रेक्षणीय बाबींचे तपशीलवार वर्णन, गाड्यांच्या वेळा, हॉटेलांच्या सुखसोयी या सर्वांची जंत्री दिलेली असते. माझ्या मनात या सर्वांहून एक वेगळ्या प्रकारचे प्रवासवर्णन लिहायचे होते. मीहि प्रवास करत होतो, पण माझी प्रवासाकडे बघण्याची दृष्टी वेगळी होती. मला प्रेक्षणीय गोष्टी बघायच्या होत्या, मंदिरातील देवतांचे दर्शन घ्यायचे होते. निसर्गसान्निध्यात शांती अनुभवायची होती. पण त्याहीपेक्षा मी जेथे जेथे प्रवास केला त्या ठिकाणच्या लोकांची मने मला अगोदर समजावून घ्यायचीं होती. त्या लोकांच्या चालीरीती, त्यांचे जीवन, त्यांच्या परंपरा समजावून घ्यायच्या होत्या. प्रवास करताना त्या प्रदेशातील माणसे, तेथील हवामान,जमीन निसर्गसौन्दर्य यांचा अभ्यास करायचा होता. इतकेच नव्हे तर प्रवासात त्यांच्याकडून काही शिकण्यासारखे असेल, घेण्यासारखे असेल तर तेहि आत्मसात कर-ण्याची माझी तयारी होती. त्याबरोबरच माणसाच्या अंगात सहनशीलता, शहाणपणा, परोपकारबुद्धी येण्याकरताही त्याने प्रवास करावा ही माझी ठाम समजूत झालेली आहे.

प्रवास करताना नाना तऱ्हेची माणसे भेटतात, नाना प्रकारचे प्रसंग गुदरतात. त्या सर्वांना तोंड देण्याची वेळ माणसावर येते. काही आपत्ती माणसाला अनेक धडे देऊन जातात. या पुस्तकात मला भेटलेली काही माणसे, प्रवासात माझ्यावर आलेले

काही प्रसंग मी निवेदन केले आहेत. त्यांपैकी एक प्रसंग म्हणजे व्ही.टी.वर मी एका जमावाकडून बुकलला गेलो तो. हजारो माणसांनी मला तुडवले, लाथाडले, नी तें लांडग्याप्रमाणे निघून गेले.

मला प्रवासात भेटलेल्या नाना प्रकारच्या व्यक्तीं-मध्ये हैदराबादचा अब्दुल्ला, जगन्नाथपुरीचा जगन्नाथ, आणि कलकत्त्याचा बंगाली कुली ! या सर्वांमध्ये मला एक माणुसकीचा धागा दिसला. त्यांच्याबाबत मी अगदी तपशीलवार लिहिण्याच्या प्रयत्न केला आहे. हे सर्व झाले प्रवासातील व्यक्ती आणि प्रसंगांसंबंधी.

मी जेव्हाजेव्हा प्रवास करून परततो त्या वेळी पाहिलेल्या भागासंबंधी डोळसपणे विचार करतो आणि माझ्या मनात एक निःश्वास प्रकटतो. या देशातील गरीबी हे त्यातील एक महत्त्वाचे कारण आहे. गाडी–मध्ये प्रवास करताना हजारो दीनदुबळे भिकारी दिसतात. त्यांच्या अंगावर कपडे नसतात. त्यांना खायला अन्न नसते. शिळेपाके अन्न प्रवासी रुळावर टाकतात ते गोळा करण्याकरता धडपडणारी गरीब पोरे, कुत्र्यांप्रमाणे धावतात तेव्हा मन सुन्न होते. स्टेशनांवरही स्वतःची बोचकी संभाळत बायाबापडे गाडीची प्रतीक्षा करतात तेव्हा त्यांच्यातील अज्ञान पाहून मनाची लाहीलाही होते. यात्रेच्या ठिकाणी प्रचंड समुदायांनी माणसे जमतात, भक्तिभावाने परमेश्वराचे दर्शन घेण्याकरता त्यांची धडपड असते. अशावेळी पुजारी व पंड्या लोक त्यांची फसवणूक करून त्यांना लुबाडतात हेही खेदजनक आहे. यात सुशिक्षित माणसेही फसवली जातात हे तर अधिकच दुःखद आहे. जगन्नाथपुरीला माझी जी कोंडी झाली ती मी काही प्रमाणात वर्णिली आहे.

पण अशा रीतीचे जे अनुभव मला आले त्यातून निःश्वास टाकण्यापलीकडे मी काही करू शकलो नाही अन म्हणूनच या पुस्तकाचे नाव मी 'प्रवास आणि निःश्वास' ठेवले आहे.

भारत हा खंडप्राय देश आहे. येथे नानाविध जाती–जमाती, भाषा आणि रीतिरिवाज आहेत पण काश्मिर पासून कन्याकुमारी पर्यंत किंवा नेपाळ पासून निलगिरी पर्यंत साऱ्या जमातीमध्ये एक धागा आहे—एकतेचा आणि राष्ट्रीयतेचा. प्रवास करतांना मी निरानिराळ्या प्रदेशात हिंडलो पण मला भारतीय माणूस हा एक वाटला. त्याची वागणूक, आतिथ्य आणि मनाची ठेवण यांत फरक आढळला नाही.

प्रवास करताना गाडीत एक डच माणूस मला भेटला होता. मी त्याच्याशी सुमारे दोन तास इंग्रजीत चर्चा केली. हॉलंड व भारत या विषयी त्याचे नी माझे बोलणे झाले. त्या वेळी त्याने मनमोकळेपणाने सांगितले की "मी गेल्या दोन महिन्यापासून निरनिराळ्या देशांतून प्रवास करतो आहे, पण भारतासारखी हिरवीगार झाडे, नद्या, नाले, पर्वत–सृष्टीचे हे रमणीय स्वरूप मला इतरत्र पहायला मिळाले नाही. इतकी समृद्ध जमीन भारताला लाभली असताना त्या देशातील कित्येक लाख लोक बेकार असावेत, उघड्यावर झोपावेत किंवा अर्धपोटी रहावेत याला दैव दुर्विलासच म्हणावा लागेल." मला त्याचे म्हणणे पटले होते. पण मी त्याला म्हणालो, "तू म्हणतोस यात थोडे तथ्य असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात या देशाने प्रगतीची फार मोठी आघाडी मारली आहे. Rome was not built in a day. त्यातूनही या देशाला नेहमीच नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. अतिवृष्टी, अवर्षण, पूर, भुकंप किंवा वादळ याने या देशाची काही प्रमाणात हानी होतच असते. त्या


हानीला तोंड देऊन जगात ताठ मानेने उभा राहू इच्छिणारा हा देश येत्या दशकात जगाच्या नकाशावर ठळकपणे वावरायला लागेल ही मला खात्री आहे."

मी पाहिलेला भारत हा असा आहे. भारतातील काही भूप्रदेशांचे, शिल्पकृतींचे किंवा मंदीर-दरोग्यांचे खरे आकर्षण विदेशी लोकांना आहे. विदेशी लोक मोठ्या संख्येने भारतात येऊन भूनंदनवन काश्मिर, जगाचे सातवे आश्चर्य ताजमहाल किंवा दक्षिण–उत्तरेतील, देवळे, शहरे पहात हिंडत असतात. भारतासारखा निसर्ग सौंदर्याने नटलेला देश पहातपहात ते सुखी होतात. आमच्या लोकांना मात्र आमच्याच देशातील या रत्नांचे मूल्य नाही. अजंठा, वेरूळ यासारख्या प्रेक्षणीय लेणी महाराष्ट्रातील कित्येक मराठी माणसांनी पाहिल्या नाहीत पण देशविदेशचे लोक मात्र ती हौसेने पहावयास येतात, यात बरेचसे समजण्यासारखे आहे. अर्थात यालाही एक दुसरी बाजू आहे. आर्थिक स्थैर्य असल्याशिवाय प्रवासाला निघता येत नाही. 'हौसेला मौल नाही,' अशी म्हण आहे. प्रवासाची हौस, आवड असली तर माणूस मग खर्चाची तमा बाळगत नाही. प्रवासात केलेला हा खर्च अनाठायी होतो असे मला वाटत नाही.

अलिकडे 'टूरिझम'ला अतिशय महत्त्व यायला लागले आहे. लोकांमध्ये प्रवासाची आवड निर्माण होऊ लागली आहे. पूर्वी वयोवृद्ध झाल्यावरच माणसानं चारही धाम यात्रा करायच्या असा संकेत होता. वार्धक्य झाले म्हणजे यात्रा करते वेळी माणूस मंदिरे किंवा निसर्ग-सौंदर्याचा आस्वाद घेऊ शकत नाही. त्याचे सारे लक्ष त्याच्या जीर्ण झालेल्या शरीराकडेच लागलेले रहाते.

तारुण्यात थोडेसे आर्थिक स्थैर्य आले तर माणसानं वर्षाकाठी दहा-पंधरा दिवस प्रवास करून आपल्या दैनंदिन जीवनातून विरगुळा मिळवावा व ‘ याची देहीं याची डोळां ’ सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घ्यावा असे येथे नम्रपणे सुचवल्यास अनाठायी होणार नाही.

—भास्कर गोळे



कोणार्क येथील सूर्यमंदिराचा दर्शनी भाग

# अतिपूर्वेकडील अपूर्वाई : कोणार्क १

सूर्य हा जगाचा शास्ता आहे. नियंता आहे. वेद आणि उपनिषदे यांनी सूर्यदेवतेची जेवढी स्तुती केली आहे तेवढी कोणीच केलेली नाही. भारतातही सूर्याचे सर्व 'कोण' (angle) दाखवणारे एक मंदीर आहे, व आज ते आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे (टुरिस्ट) एक आकर्षण स्थान झाले आहे. देशो-देशींचे लोक या मंदिराला भेट देऊन जातात व इ. स. च्या बारा-तेराव्या शतकात बांधलेल्या या अद्‌भुत, वास्तूचे गुणगान गात थक्क होतात. दिवाळीच्या सुटीत 'कोणार्क' येथे असलेल्या या सूर्यमंदिराचे, सूर्यदेवतेचें दर्शन घ्यावे, असा एक विचार बरेच दिवसांपासून माझ्या मनात ठाण मांडून होता. एका गणेशोत्सवात एका गणपतीच्या मूर्तीपुढे कोणार्कच्या सूर्य-मंदिराचे कृत्रिम दर्शन घडवण्याचा प्रयत्न केलेला होता पण तो प्रयत्न बऱ्याच अंशी असफल होता असे आज ते मंदीर बघितल्यावर मी म्हणू शकेन. ते काहीही असले तरी सूर्यमंदीर बघण्याची एक विलक्षण तळमळ मात्र माझ्या मनात त्या कृत्रिम दृश्याने निर्माण केली, हे खरे!

माझ्या भौगोलिक (अ) ज्ञानात भर पडली. सूर्यमंदीर आणि 'कोणार्क' कुठे आहे हे मला कळेना. कुणी म्हणाले ते खजुराहोजवळ आहे, कुणी म्हणाले ते मद्रासजवळ आहे. कुणी म्हणाले उत्तरेत आहे. मी माझ्या मुलाला विचारले तेव्हा तो म्हणाला 'कोणार्क' बद्दल धडा होता आता आठवत नाही. एस. एस. सी. पास झालेल्या मुलीलाही 'कोणार्क' कुठे आहे ते सांगता आले नाही. माझ्या भौगोलिक अज्ञानाप्रमाणेच नुक-तेच शिकत असलेल्या मुलामुलींचे (अ)ज्ञान पाहून मला मनोमन संतोष वाटला. मी माझ्या सौ.कडे 'कोणार्क' बघायला जाऊ या का? म्हणून

प्रस्ताव मांडला तेव्हा तिने नाक उडवत उत्तर दिले, ‘ मला नाही बाई इन्टरेस्ट त्या मंदिरात—जायचं असलं तर आपण पुरीला जाऊ या. जगन्नाथाचं मंदीर बघायला ! म्हणजे काशी–रामेश्वर झालंय तिसरं धाम तरी होऊन जाईल.’ नाईलाजाने मग मी हा प्रस्ताव मंजूर केला. त्याच दिवशी दुपारी आमचे एक शेजारी मला म्हणाले, ‘ पुरीला जाणार आहात मग ‘ कोणार्क ’ बघायला विसरू नका— भुवनेश्वर पण पहाच !’

‘ म्हणजे कोणार्क पुरीजवळ ओरिसात आहे का ?’ मी विचारले.

‘ हो–पुरीपासून जवळच. अवघ्या ४०।५० कि. मीटरवर.’

‘ बरं झालं. म्हणजे पुरी होईल नी कोणार्क पण !’

मला खूप हायसं वाटलं. माझी मनोमन इच्छा सूर्यदेवाने ऐकली.

आम्ही कोणार्कला जाण्याकरता (व्हाया हैदराबाद) सिकंदराबादचे रिझर्वेशन केले. पोटापाण्याच्या उद्योगातून थोडा मोकळा वेळ काढून कुठंतरी दूर प्रवासाला जायचा हा आमचा (म्हणजे माझा व सौ.चा) क्रम गेल्या तीन–चार वर्षांपासून सुरू आहे. पहिल्या वर्षी, गोवा झालं, दुसऱ्या वर्षी दक्षिणेचा भाग, बंगलोर, म्हैसूर, मदुराई, कन्याकुमारी, रामेश्वर अन मद्रास झालं. तिसऱ्या वर्षी काशी, अलाहाबाद, नेपाळ झालं. चौथे वर्षी दिल्ली, आग्रा, जयपूर, ऋषिकेश, अन हरिद्वार झालं. यंदा कुठं जाणार हा प्रश्न दिवाळीची सुट्टी लागण्यापूर्वी अनेकांनी विचारला पण त्याला निश्चित उत्तर देता येत नव्हतं. नुसतंच ‘ कोणार्कचं सूर्यमंदीर बघायला जायचंय ’ एवढंच मोघम उत्तर असे.

शुक्रवार ता. १६।१२।७४ ला सायंकाळी ५ वाजता आम्ही सिकंदराबाद एक्स्प्रेसमध्ये राखीव जागेवर स्थानापन्न होऊन पुणे सोडले. बसताना शेजारी कोणकोण आहेत याची वरवर चौकशी केली. हैद्राबादला जाणारं एक बरंच मोठं मुसलमान कुटुंब आमच्या शेजारी बसलं होतं. त्यात तीन स्त्रिया व चार पुरुष होते. मंडळी खानदान कुटुंबातली असावी. गाडी चालू होताच त्यांचे अस्खलित उर्दूमिश्रित हिंदी बोलणे सुरू झाले. त्याबरोबर पानतमाखूचे पितळी डबेही उघडले गेले. त्यांनी मोठ्या अदबीने ते नबाबी थाटाचे डबे आमच्या समोरही ठेवले. सवयीप्रपाणे मी त्या डब्यातील एक लवंग उचलली. मिसेसने

मात्र सुपारीच्या खांडालाही हात लावला नाही. सायंकाळी दिवेलागणीचा सुमार झाला. त्या मुसलमान कुटुंबातील पुरुषांनी गाडीत नमाज पढायला सुरुवात केली. सर्वच धर्मांनी सूर्यनारायणाला आपला रक्षणकर्ता मानलेले आहे. मी सूर्यमंदिराकडे धाव घेतली होती तर ते मुसलमान कुटुंब मावळत्या सूर्याची प्रार्थना करीत होतं. काशीला उगवणाऱ्या सूर्याला अर्घ्य देताना गंगानदीच्या पात्रात उभ्या असलेल्या वेदोनारायणाला पाहताना मला जितका आनंद झाला होता तितकाच आनंद मावळत्या सूर्याची प्रार्थना करण्याकरता गुडघे टेकून नमाज पढत असलेल्या त्या मौलवीकडे पाहूनही झाला होता. मी सूर्यमूर्तीपुढे मस्तक टेकीत होतो तर तो मौलवी गुडघे टेकीत होता, इतकाच फरक.

पुणे स्थानकावर मिलिटरी ऑफिसरांची बदली झालेली दोन तरुण कुटुंबे उभी होती. गाडी येण्यापूर्वी त्यातील मुख्य पार्टी ( नवराबायकोच्या दोन जोडचा ) संभाषणात मग्न होत्या. त्यांची मुले त्यांच्या आया संभाळत होत्या. एका बाजूचा तरुण दुसऱ्या बाजूच्या तरुणीशी हस्तांदोलन करीत होता. त्यांनी एकमेकांचा हात बराच वेळ धरून ठेवला होता. दुसऱ्या हाताने हळूच तिला मागे ओढून त्यानं तिच्या केसांचे चुंबन घेतले. मला ते दृश्य जरा वेगळं वाटलं. इंग्लंडमध्ये दिसणारं दृश्य भारतात दिसलं– मिलिटरीत सामान्य असेलही पण रेल्वेप्लॅटफॉर्मवर मात्र जरा अनुचित होतं. नवरा–बायकोंना एकमेकांचे चुंबन (केसांचे) घ्यायला माझी हरकत नव्हती, परंतु परपुरुषाने घेतलेले त्या परस्त्रीच्या केसांचे चुंबन माझ्या दृष्टीने आक्षेपार्ह होय. असो. मी मनाची समजूत घालत होतो, मॉडर्न सोसायटीच्या ह्या साऱ्या एटिकेटसना आता आपण सामोरं जायला हवं. कारण ह्यापेक्षाही खळबळजनक दृश्य मला पुढील प्रवासात खालच्या वर्गातही बघायला मिळणार होतं. मी मनोमन कबूल केलं की 'मॉडर्न सोसायटी' 'मॉर्डन सोसायटी' म्हणून आपण ज्याचा उदोउदो करतो तो एक भ्रम आहे. माणसाचं आयुष्य हेच मुळी Complex (गुंतागुंतीचं) आहे.

गाडीनं पुण्याचा प्लॅटफॉर्म सोडला अन् एक अनामिक हुरहुर मनाला लागून राहिली. नेहमीच्या कार्यातून अगदी निवांत होऊन पुढील एकाकी

पंधरवडा गाडीतच काढायचा होता. त्यामुळे दूरवर पसरलेलं क्षितिज, धावणारी झाडं अन पाठशिवणीचा खेळ खेळणारी जमीन-आकाश याकडे एकटक पहात मनरंजन करायचं किंवा वाचण्याकरता घेतलेली पुस्तकं-मासिकं चाळायची एवढाच विरंगुळा. नाही म्हणायला एखादं मोठं स्टेशन आलं की तो नेहमीचा चहा शेवचिवड्याचा गोंगाट पसरे; नवनवीन व्यक्ती घाईगडबडीत चढत अन गाडी चालू लागे. दोनतीन तास मी अशाच रिकाम्या मनानं घालवले.

काही वेळानं मात्र माझ्या मनपसंत कार्यक्रम सुरू झाला. वीस-पंचवीस तरुण मुले-मुली (मुंबई कॉलेजची असावीत) आमच्या शेजारच्या डब्यात शिरली. अन् त्यांनी रेकॉर्डप्लेयरवर नानारंगांची, ढंगाची गाणी वाजवून नाच सुरू केला. (इतरांच्या मते तो नंगा होता.) तरण्यावांड, खेळकर, बेलबॉटम स्कर्ट घातलेल्या मुली अन लुंग्या लावून फक्त गंजीफ्राकमधे वावरणारे भरदार रुबाबदार देहयष्टीचे तरुण यांचा एकच धिंगाणा सुरू झाला. मी तडक दुसऱ्या डब्यात शिरलो. अलीकडे अतिशय लोकप्रिय झालेली अझीझ नाझा कव्वालीची 'झूम बराबर झूम' ही कव्वाली टाळ्यांच्या तालावर सुरू झाली तेव्हा नाचगाण्याला ऊत आला. मलाही त्यांच्यामधे सामील होऊन एखाद्या गुलछबूच्या खांद्यावर हात ठेवून नाच-ण्याची इच्छा झाली. पण—काय धिंगाणा चाललाय हे पहायला ते मुसल-मान कुटुंब त्या डब्यात अवतरलं अन त्यांच्याच मागोमाग आमच्या सौ.! माझी नाचण्याची इच्छा मी मनातच दाबून टाकली अन एखाद्या उच्चभ्रू प्रवाशा-सारखा आंबट चेहरा करून मुला-मुलींकडे पाठ फिरवून बसलो. अर्थात समुद्रात आपण पोहू शकत नाही तरी समुद्राच्या फेसाळणाऱ्या लाटांचं तांडवनृत्य पाहण्याचा अनुभव किती मजेशीर असतो याची कल्पना समुद्र-किनाऱ्यावर असणाऱ्यांनाच असते हे मला जाणवलं.

रात्री दीडदोनच्या सुमारास सोलापूर आलं असावं वाटलं. शेजारच्या डब्यातला तो धांगडधिंगा थांबला होता. बहुतेक सारे प्रवासी झोपेने घेरले होते. बर्थ रिझर्वेशनमुळे आम्हीही निवांतपणे झोपेच्या अधीन झालो होतो. सकाळी सहाच्या सुमारास जागे झालो तेव्हा कुणीतरी 'नामपल्ली आलं,

नामपल्ली आलं' असं ओरडत आपापले बिछाने गुंडाळत उठले. लगेच सारा डबाच रिकामा झाला. आमच्याबरोबरचं मुसलमान कुटुंब सिकंदराबादला उतरणार होतं. त्यांनी नामपल्ली म्हणजे हैद्राबादच असं सांगितल्यानंतर आम्हीही धावपळ करून सामानाची बांधाबांध करून गाडीतून खाली उतरलो. नेहमीप्रमाणे मी रिक्शावाला शोधला, नव्हे तो मलाच शोधत आला व त्यानं आमचं सामान घेऊन आपल्या रिक्शात ठेवलं.

'कहा जाना है बाबुजी ?' रिक्शावाल्यानं मला प्रश्न केला.

'यहाँ कोई अच्छासा होटल है क्या ? अच्छासा याने पंधराबीस रुपया तकका.' मी खुलासा केला.

'होटेल तो बहूत है साब, चलिये आपको दिखाता हूं !'

'नजिकमेही कोई होगा तो देखना.' मी त्याला सांगितले.

पहाटेची बोचरी थंडी अंगाला झोंबत होती. रस्त्यावर एक चिटपाखरूही फिरकत नव्हतं. भव्य डांबरी रस्ते नी अत्यंत सुंदर शहर म्हणून मी हैद्राबादची ख्याती ऐकली होती. योजनाबद्ध आलेखन करूनच प्रसिद्ध इंजिनिअर विश्वेश्वरअय्या यांनी नबाबाच्या सांगण्याबरहुकूम हे शहर वसवलेलं असल्याचं ऐकलं होतं. त्यात खोटे काहीही नाही. पूर्वीचे संस्थान असल्याकाळचे त्याचे वैभव आजही वास्तूच्या रूपाने जसेच्यातसे दिसत होते. इतकेच नव्हे तर तिथल्या सामान्य माणसाच्या बोलण्यात तीच अदब, वागण्यात तीच नबाबी अन् दिलदारपणा होता. पैशानं मात्र तो पूर्वीपेक्षाही आता गरीब झाला होता.

'क्या नाम है तुम्हारा ?' मी रिक्शावाल्याला प्रश्न केला.

'अब्दुल्ला.' त्यानं उत्तर दिलं.

'हैदराबादमें देखनेलायक क्या है ?'


'बहुतकुछ साब ! सालारजंग म्युझियम, नागार्जुन सागर डॅम, नौबत पहाड, सारा शहरही देखनेलायक है !'

'मगर हमारा मुक्काम सिर्फ दो दिन है !'

'कोई बात नही. वो उधर दिखाई दे रहा है ना वहाँसे सरकारी बस निकलती है. आप मेरे साथ आईये ! मैं आपको टिकिट दिलवा देता हूँ !'



कोणार्क येथील उडिसा शिल्पाचा नमुना



कोणार्क येथील उडिसा शिल्पाचा आणखी एक नमुना

'बरं, अगोदर हॉटेलात तर जाऊ !' मी त्याला म्हणालो.

रवींद्र मंडपाच्या चौकातच एका हॉटलात आम्ही आमचा धामा टाकला. हिवाळ्याचे दिवस असल्यामुळे कुठेच फारशी गर्दी नव्हती. आम्हाला सहजपणे खोली मिळाली. हॉटेल अलिशान होते. मी आता हैदराबादचा नबाब असल्यागत वावरू लागलो.

'देखो भाई अब हम कहीं नही जा सकेंगे. तुम हमको टुरिस्ट बसकी टिकट ला देना !'

'मगर बावुजी तीस रुपये लगेंगे. आप मेरे साथ आनाही अच्छा पडेगा !'

'ये तीस रुपये लेकर तुमही जाओ ना. टिकट ला देना !'

'मगर...'

'तुम्हारा धंदा यही ना ! हम उसका मेहनताना अलग देंगे.'

'साब ! हमारे मेहनतानाकी बात नही. हम यकीन नही कर पाते की आप हमपर इतना विश्वास कैसे कर रहे हो. आपने हमारा पूरा नाम या पत्ताभी नही पूछा। ये देखो हमारा रिक्शाका लैसन.'

'रहने दो रहने दो. तीस रुपयाके वास्ते हम इतनी पूछताछ नही करना चाहते.'

मी नंतर शांतपणे त्याला म्हणालो, 'अरे बावा, तीस रुपये लेकर तुम कहा जानेवाले हो ! हमने सुना है हैदराबादके लोग दिलके बडे होते है !'

'आपकी बात सही है लेकीन पुराने जमानेमे. आप इतना विश्वास इस जमानेमें नही रखना चाहिये.'

मी अब्दुल्लावर विश्वास ठेवला खरा. आमच्यामध्ये इतकं सगळं संभाषण झालं हेही खरं पण त्याला एक तासापेक्षा जेव्हा जास्त उशीर झाला तेव्हा माझ्या तीस रुपयाला आता चाट बसणार हे माझ्या सौ. नं मला पटवण्याचा वारंवार प्रयत्न केला. पण माझं मन मला सांगत होतं, माझी माणसांची पारख आजपर्यंत चुकली नाही. अब्दुल्लाच्या बाबतीत ती चुकणार नाही अन् चुकली तर तीस रुपयावर पाणी सोडून द्यावं लागणार होतं.

साडेनवाच्या सुमारास मी अब्दुल्लाला रिक्शा घेऊन येताना दुरून पाहिलं अन माझा जीव भांड्यात पडला. मी लगेच छाती फुगवून सौ. ला म्हटलं, ' बघ. मी म्हणालो ना अब्दुल्ला येईल म्हणून.'

अब्दुल्ला धापा टाकीतच लॉजमध्ये आला.

' चलिये बाबूसाब. जल्दी चलिये. बसका टेम हो गया है. सरकारी बस चल दी है. प्रायव्हेट बसका टिकिट निकालकर आया हूं इसलिए देर हुअी-- ये बस दस बजे छुटनेवाली है !'

अब्दुल्ला, जोरजोराने धापा टाकत रिक्शांचे पैडल मारत आला होता. एवढ्या थंडीतही तो घामाघुम झाला होता.

'अब्दुल्ला, तुम ऐसा करो. कल हम जगन्नाथ पुरी जायेंगे. रिझर्वेशन कर लाना. दो तिकिट है, ये लो सो रुपया.'

मी अब्दुल्लाला शंभर रुपयाची नोट देत असतानाच सौ. माझ्याकडे डोळे वटारून पहात होती. पण मी तिला जुमानलं नाही.

' बाबू साब एक सौ रुपया–' असं काहीसं पुटपुटत अब्दुल्लानं माझ्या हातून ती नोट घेऊन जलदीने तो निघून गेला.

' अहो ! हे काय कुठला तो अनोळखी रिक्शावाला ! तो परत आला नाही तर तुम्ही कुठं जाणार आहात त्याला शोधायला ?'

सौ.नं मला फैलावर घेतलं.

' तुझं म्हणणं खरंय, पण आपल्याला हैदराबाद दर्शनमध्ये दोन दिवस घालवावे लागणार. रिझर्वेशन अन् तिकिटाच्या लाईनीत एक दिवस जाणार त्यापेक्षा अब्दुल्लाला दोन–चार रुपये दिले तर काम नाही का होणार ?'

' अहो पण इतके पैसे देताना काहीच कसं वाटलं नाही तुम्हाला ? तुम्ही जर लाईनीत उभा राहिला असतात तर काही बिघडलं असतं ? मला मेलीला साडीला पैसे देताना तुमच्या जिवावर येतं अन त्या अनोळखी कधी न पाहिलेल्या इसमाला तुम्ही खुशाल शंभर रुपये दिलेत अन उगीचच डोकेदुखी घेतलीत.'

' अग, मी त्याला तिकिटाला पैसे दिलेत. बक्षिस म्हणून नव्हे'-- मी खुलासा केला.

पण सौ. चं मन उगाचच संशयग्रस्त झालं. आता तिकिटही गेलं अन् पैसेही गेले हे तिच्या मनानं ठामपणे घेतलं. ती माझ्यावर तोंडसुख घेऊ लागली.

माझा स्वभावही तसा चमत्कारिक आहे. ( म्हणजे तो इतरांना तसा वाटतो. ) कुठेतरी एखादा टेन्स निर्माण करायचा, गुंता करून ठेवायचा अन मग तो सोडवण्याकरता जिवाचं रान करायचं (स्वतःच्या नाही; दुसऱ्यांच्या. इति सौ.) कारण गुंता झाला तरी मी त्याकडे अलिप्तपणे पहात रहातो. ती वीण मग समयानुसार सुटत राहते. पण ती बघताना मला कमालीचा आनंद होत राहतो. ज्या जीवनात टेन्स नाही, गुन्ता नाही ते जीवनच नाही असं माझं ठाम मत आहे.

हैदराबादची काही प्रेक्षणीय स्थळे उदा-उस्मानिया युनिव्हर्सिटी, सालारजंग म्युझियम, नौबत पहाड, उस्मानसागर तलाव, गोवळकोंडा किल्ला इत्यादी बघून आम्ही संध्याकाळी सातच्या सुमारास लॉजवर परतलो. लॉजच्या मालकाजवळ अब्दुलानं रेल्वेची तिकिटे दिली किंवा काय याबद्दल मी चौकशी केली, परंतु तो आलेलाच नसल्याचं समजलं. आता मात्र खरोखरीच टेन्स निर्माण झाला होता. तीस रुपयांबद्दल प्रामाणिकपणा दाखवून शंभर रुपयांना टांग बसणार की काय ? अशी शंका आता मलाही सतावू लागली होती. मी मनातल्या मनात सूर्याची प्रार्थना सुरू केली.

> जयाच्या रथा एकची चक्र पाही । नसे भूमि आकाश आधार काही । असे सारथी पांगुळा ज्यास रथी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। १ ।। करी पद्म माथा किरिटी झळाळी प्रभा कुंडलाची शरीरा निराळी । पहा रश्मि ज्याची त्रिलोकासि कैसी । नमस्कार त्या सूर्यनारायणाशी ।। २ ।। सहस्रद्वये दोनशे आणि दोन । कमी योजने तो निमिषार्धतन मना कल्पवेना जयाच्या त्वरेसी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ३ ।। विधिवेष कर्मासी आधारकर्ता । स्वदाकार स्वाहादि सर्वत्र भोक्ता । असे अन्नदाता समस्ता जनांसी ।

नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ४ ।। युगे मंत्र कल्पांत ज्याचेनी होती । हरिब्रह्मरुद्रादि ज्या बोलिजेती । क्षयाती महाकाळरूप प्रकाशी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ५ ।। वेष्टोनिया पूर्वपंथे । भ्रमे जो सदा लोक रक्षावयासी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ६ ।। समस्तासुरा माजि तू जेचिया म्हणोनीच तू श्रेष्ठ या नाम सूर्या । दुजा देव तो दाखवी स्वप्रकाशी । नमस्कार त्या सूर्यनारायणाशी ।। ७ ।।

आणि आश्चर्य म्हणजे अर्धवट स्तोत्र होत नाही तोच अब्दुल्ला लॉजमध्ये येऊन दाखल झाला.

'बाबुजी टिकिट मिल गये है. लेकिन रिझर्वेशन फॉर्म भरनेका मुझे मालूम नही था. मेरे नामपे सब कुछ कर दिया है. ये आपके टिकिट और ये आपके बचे हुअे पैसे. संभालना. टिकिटबाबू बहूत पैसे मांगता था. मैंने चार रुपये दिये है। जमाना बुरा है बाबुसाब, जमाना बुरा है. आप जैसे लोगोके लिए कुछ करना चाहा और कर दिया है. खुदा हाफीज !'

अब्दुल्ला निघून जात होता. मी त्याला बोलावलं. त्याच्या हातावर दहा रुपयाची नोट ठेवली. तो गदगदला 'इतने पैसे काय के ?' त्यानं मलाच प्रश्न केला.

'तुम्हारे मेहनत और सच्चाईका फल.' मी म्हटलं.

अब्दुला निघून गेला. त्याला मनोमन आनंद झाला होता. मलाही आनंद झाला होता. माझ्याकरता त्यानं मेहनत घेतली होती. तो माझ्या ओळखीचा नव्हता–पाळखीचा नव्हता. माणुसकीचं हे असं उदात्त दर्शन जेव्हा मला केव्हातरी, कुठेतरी होतं–तेव्हा माझे हात जोडले जातात.

# अतिपूर्वेकडील अपूर्वाई : कोणार्क २

येनकेनप्रकारेण हैद्राबादवरून आम्ही जगन्नाथपुरीला जायला रात्री नऊच्या सुमारास गाडीत बसलो. प्रवास बराच लांबच्या पल्ल्याचा होता. खुर्दा-रोड जंक्शनला उतरून तेथून गाडी बदलून जगन्नाथपुरीला जायचे होते. (हिवाळी) पावसाची पूर्वचिन्हे होती, आकाश ढगांनी भरले होते. दुतर्फा भातशेती, हिरवीगार नारळाची झाडे यांनी कित्येक मैल लांब जमीन व्यापली असल्याचे जाणवत होते. कारण गार वारा अंगाला झोंबून जायचा नी सरसरून काटा आणायचा.

एक्स्प्रेस आपल्या तंद्रीत जात होती. गाडीने नादमधुर ध्वनी (रिदम) व मधूनच रुळांचा खणखणाट यांची एक विलक्षण लय साधलेली होती. रात्री अकराच्या सुमारास डोळे पेंगुळले नी मी पहाटे जागा झालो तेव्हा हिरव्यागार वनश्रींनी वेढलेली सृष्टी पाहून माझे भान हरपल्यासारखे झाले. कोस्टल विभागातून जात असलेली तालबद्ध गाडी व त्यातूनही पावसाळ्याच्या दिवसांमुळे सृष्टीसौन्दर्याला आलेला बहर यामुळे डोळ्यां-बरोबर कानही तृप्त झाले होते.

ह्या बाजूला नद्यांवरील पूल अतिशय लांब असून नद्यांची पात्रेही खूपच रुंद आहेत. राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांच्या हस्ते खुला करण्यात येणारा गोदावरीवरील पूल असाच लांब व भव्य होता. तो आम्हाला आदल्या दिवशीच पहायला मिळाला. महानदीवरील पूलही असाच मैल-दोन मैल लांब असून पात्राकडे बघताना अक्षरशः डोळे फिरत होते.

अजून आम्ही तेलंगण म्हणजे आंध्रप्रदेशातूनच प्रवास करत होतो. संध्याकाळी ६ ते ७ च्या सुमारास वाल्टायर आले. येथे मिलिटरीचा मोठा

कँप आहे. एरोड्रोमवर विमानांची जा–ये चालू होती, ती आम्ही गाडीतूनच पाहिली. तेलंगण जवळजवळ येथे संपत होता व येथूनच नजिक ओरिसाचे राज्य सुरू होणार होते. तेलंगणचे लोक रंगाने काळे, धिप्पाड परंतु मनानं सरळ आहेत. ह्या प्रदेशाइतकी गरीबी कुठंच नाही. सर्व प्रदेशातच भाताची लागवड मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे नारळ, भात व मासे हे मुख्य अन्न आहे. मैलन् मैल भातांची रोपे गुडघ्याभर पाण्यात कॅचमेंटमध्ये दिसत होती. मधूनमधून कमळाच्या फुलांचे ताटवेच्या ताटवे दृष्टीस पडत होते. गाडी शांतपणे चालू होती.

रात्री दोनच्या सुमारास खुर्दा–रोड जंक्शनवर आम्हाला उतरायचे होते. रात्री ८ च्या सुमारास जे काही स्टेशनवर मिळाले ते पोटात ढकलून आम्ही रिझर्व्हड जागेवर झोपी गेलो. पावसाची रिपरिप सुरू होती. अनोळखी प्रदेश व भाषेचा गंध नाही यामुळे बरीच कुचंबणा होत होती. बहुतेक सगळी गाडी रिकामी होती. लहानलहान स्टेशने जातयेत होती. मी दोन–तीन वेळा दचकून जागा होऊन कोणते स्टेशन आले याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला, पण मला त्याचा पत्ता लागला नाही. स्टेशनावर कुठेच फारसे दिवे नसल्यामुळे व ढगांमुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्य असल्यामुळे आपले स्टेशन निघून तर जाणार नाही ही भीती सतावत होती. शेवटी मी आमच्या डब्याच्या कंडक्टरला खुर्दा–रोड स्टेशन केव्हा येणार म्हणून त्याला झोपेतून उठवून चौकशी केली. त्याची झोपमोड झाल्यामुळे त्यानं मला तेलगू भाषेत बऱ्याच शिव्या दिल्या असाव्यात असे एकूण त्याच्या त्रासिक बोलण्यावरून व चेहऱ्यावरील हावभावावरून मला जाणवले. अर्थात चूक माझीच असल्यामुळे मी तेथे गप्प उभा राहिलो.

मी नवीन प्रदेशातील आहे व मला इकडील भागाची ओळख नाही, तसेच भाषेची अडचण असल्यामुळे मला खुर्दा–रोड स्टेशनवर बरोबर उतरवून द्यावे अशी मी त्या कंडक्टरला विनंती केली तेव्हा त्यानेही ते मान्य करून मला निर्धास्तपणे झोपी जाण्यास सांगितले.

खुर्दा–रोड जंक्शन आले तेव्हा आमच्या डब्यातील बहुतेक सारेच प्रवासी खाली उतरले. ते सारे जगन्नाथपुरीचेच होते. कंडक्टरनेही मला

स्टेशन येताच उतरायला सांगितले. रात्री दोन–अडीचची वेळ होती. काळामिट्ट अंधार व पावसाची भुरभुर यामुळे वातावरण भीतिदायक होते. गाडी एका बाजूला लागली. हमालाच्या मदतीने कसेतरीं आम्ही मुख्य प्लॅटफॉर्मवर आलो व बाकावर धामा टाकून थोडी विश्रांती घेतली. पुरीला जाण्याकरता सकाळी ६ व ८ ला दोन गाड्या होत्या.

मला माणसांची पारख आहे, असा एक ग्रह ज्योतिषाने मला बरेच वर्षापूर्वी करून दिलेला आहे. समोरची व्यक्ती पाहताच (मला फेस रीडिंगचे थोडेसे ज्ञान आहे) माझे तिच्याबद्दलचे अंदाज तत्काळ मनात तयार होतात व मी त्याप्रमाणे वागू लागतो. काही काही वेळा अंदाज चुकतात तेव्हा मी फेस रीडिंगच्या शास्त्राला शिव्या देऊ लागतो. तरीपण एकूण आत्तापर्यंतच्या अनुभवावरून हे चुकलेले अंदाज फारच कमी आहेत.

सांगायचा मुद्दा असा की मी स्टेशनवरून बाथरूमकडे जात असताना मला एक व्यक्ती भेटली. हाफपँट, हाफशर्ट, पांढरी टोपी, एका पायाने दुडकत चाललेली ती मूर्ति पाहून मी हिंदीत प्रश्न केला,--

'बाथरूम इधर है क्या जी!'

वास्तविक ह्या प्रश्नाचे होय किंवा नाही हे उत्तर मला मिळाले असते तरी चालले असते. पण त्या व्यक्तीला माझ्याबद्दल विलक्षण आपुलकी निर्माण झाली. त्याने मला नुसतीच बाथरूम दाखविली नाही तर तो माझे सारे सामान घेऊन साऱ्या फलाटभर हिंडला. पुरीची तिकिटे आणून दिली. माझ्या त्या त्या वेळच्या साऱ्या अडचणी त्याने आनंदाने सोडवल्या. स्वभावाने मात्र तो विलक्षण बोलघेवडा होता. त्याचं इंग्रजी तर विलक्षण फाकडू होतं. आपण इंग्रजी बोलू शकतो हे त्याला अभिमानाचं वाटत होतं.

'Sir, you understand my English' तो मधूनमधून मला प्रश्न विचारायचा.

मी 'यस' म्हटले कीं तो डोळे वटारून 'वॉट्ट' म्हणायचा.

'युवर इंग्लिश' मी म्हणायचो.

'वॉट्ट' पुन्हा तो म्हणायचा.

आमची ही जुगलबंदी बराच वेळ चालल्यानंतर विषयांतर म्हणून मी त्याला वेगळाच प्रश्न विचारी,

'जगन्नाथ! What time Puri गाडी ?'

Two trains morning, Two trains evening. You go morning. Come 5. Go Bhuvaneshwar, I will come. Meet evening. You understand, my English.'

'yes.'

'वॉट्ट'

'व्हॉट युवर नेम ?' जगन्नाथानं विचारलं.

'भास्कर.' मी म्हणालो.

'बास्कर—बास्कर.' त्यानं प्रयत्नपूर्वक घोकतघोकत नी मान हलवत म्हटलं.

'हां. हां. बास्कर.'

'युवर नेटिव प्लेस ?'

'पूना'— मी आता बराचसा कंटाळलो होतो.

'आय आलसो पूना...ह. हं.'

'मेनी यिअर्स...पूना...आय...यू अंडरस्टँड माय इंग्लिश.'

'यस.' मी डोळे मिटून उत्तर दिले.

'वॉट्ट'

'युवर इंग्लिश' मी म्हणालो.

'ओके, ओके.' तो म्हणाला.

'हौ मेनी चाइल्ड ?'

'वन.'

'ओन्ली वन.'

'यस.'

'नेम.'

'सुनील.'

'यस.'

'थर्टिन.'

'व्हेरी गुड...व्हेरी गुड.' आभाळाकडे नमस्कार करीत जगन्नाथ पुटपुटला.

'गॉड...यु नो गॉड...ग्रेट...'

'व्हेरी, व्हेरी ग्रेट.' मी म्हणालो.

'सॅलरी'—जगन्नाथानं प्रश्न केला अन् मी चपापलो. काहीतरी थाप मारायची म्हणून मी म्हणालो.

'फाइव्ह हंड्रेड.'

'कमिंग फ्रॉम पूना... गोईंग टु पुरी यात्रा स्पेंडिंग सो मच. हौ मेनी मनी...?'

'वन थावजंड'– मी (अ)प्रामाणिक उत्तर दिले.

'युवर मिसेस टीचर?... टीचर?...' जगन्नाथ म्हणाला.

माझ्या सौ.च्या एकंदर चष्म्याच्या ठेवणीवरून त्यानं हा सहज प्रश्न केला असावा.

'अं ऽऽ यस.' मी पुन्हा थाप मारली.

'सॅलरी ... फाइव्ह हंड्रेड ... टोटल वन थावजंड! करेक्ट?' तो म्हणाला.

मी म्हणालो 'यस.'

पुन्हा आभाळाकडे डोळे करून व हात जोडून प्रार्थना करीत त्यानं उडिया भाषेत भजन म्हणायला सुरवात केली. आता माझ्या मिळकतीचा अंदाज त्याला आला असल्यामुळे तो मनोमन सुखावला होता.

जगन्नाथाचा आवाज चांगला असावा. तो म्हणत असलेले भजन श्रुतिमधुर होते.

'यु.सी. बासकर. आय...सिंगर. भजन सिंगर' जगन्नाथानं मधेच आपली कहाणी सांगायला सुरवात केली.


'आय गेट सम मनी. समबडी सम मनी गीव. आय हॅपी–आय हॅपी–'

'गॉड इज ग्रेट--ग्रेट--' मी पण त्याची सांपत्तिक स्थिती सुखासमाधानाची पाहून आनंदलो.


'मिस्टर– बास्कर– नाव ट्रेन कमिंग. गो पूरी–कम इव्हिनिंग. आय–हियर सिक्सोक्लॉक–आय– गाईड यू भुवनेश्वर. माय टिकिट; खानापिना सी भुवनेश्वर सिटी ऑफ टेंपलस' आय गाईडस ' जगन्नाथानं गाडी प्लॅटफॉर्मवर येईपर्यंत आपली टकळी चालूच ठेवली. गाडी येताच त्यानं आमचं सारं सामान गाडीत ठेवलं नी तो हात जोडून उभा राहिला. काही बक्षिसी मिळेल या अपेक्षेने तो उभा असावा व आतापर्यंत त्यानं दिलेल्या सर्व्हिसबद्दल एकूण त्याला चारआठ आणे द्यावे या इराद्यानं सौ.नं आपली पर्स उघडली.

'नो–नो– बासकर. यू आर व्हेरी गुड पिपल. आय नॉट टेक मनी यू स्पेंड वन थावजंड. गॉड ग्रेट– आय कम इव्हिनिंग– भुवनेश्वर. खाना–पिना–' अन् तो गाडी खाली उतरून तरातरा निघून गेला. पुरीहून संध्याकाळी येणाऱ्या गाडीत तो आता आम्हाला शोधणार होता, आमच्याबरोबर भुवनेश्वर दाखवायला हिंडणारा होता, आमचा गाईड बनून देवदर्शन करणार होता. पण ही त्याची इच्छा पुरी होणार की नाही हे कुणालाच माहीत नव्हते. कारण पुरीहून आम्ही केव्हा निघणार हे आम्हालाच ठाऊक नव्हते. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी बराच वेळ पहात राहिलो. त्यानं न घेतलेल्या पैशामुळे माझ्या मनावर त्याच्या साधेपणाचा एक ठसा उमटून राहिला होता. हैद्राबादचा अब्दुला, खुर्दा रोडचा जगन्नाथ व मला पुढे भेटलेला कलकत्त्याचा तो बंगाली कुली ही भिन्न प्रांतीय, भिन्न भाषीय खालच्या वर्गातील माणसं माणुसकीच्या एका विलक्षण धाग्यानं बांधलेली होती. माझ्यासारख्या अगदी अनोळख्या माणसाशी ती नुसत्या आपुलकीनंच नव्हे तर हृदयाच्या एका कणवेनं वागली होती. तीत माया होती, स्नेह होता, पण स्वार्थ नव्हता. मतलब नव्हता. अन् म्हणूनच मी जगन्नाथाच्या पाठमोऱ्या आकृतीला मनोमन हात जोडले होते.

...३



उडिया शिल्पातील प्रणयी युग्म शृंगार रसात न्हाऊन निघाले आहे.



देवळाच्या आवारातील प्रचंड हत्तीच्या सोंडेतील मानवाकृती पाहून मन धास्तावते.

# अतिपूर्वेकडील अपूर्वाई : कोणार्क ३

खुर्दा–रोड स्टेशनवरून आम्ही जगन्नाथपुरीच्या गाडीत बसलो. गाडी बहुतेक सगळी रिकामी होती. काही प्रवासी होते त्यापैकी बरेचसे भगवी कफनी घातलेले, अंगाला राख फासलेले साधूच होते. अपंग आणि शारीरिक व्याधी असलेले भिकारी होते. माझ्यासमोर एक नवीनच लग्न झालेलं कोवळं बंगाली जोडपं होतं. त्यांनी एकमेकांच्या हातांत आपले हात गुंफले होते. तिचे भावस्पर्शी डोळे सारा वेळ त्याच्या डोळचांत गुंतले होते. वर आणि वधू दृष्ट लागण्यासारखी होती. मुलगी खूपच सुंदर होती. तिने भरजरी, लाल रंगाचा शालू नेसला होता. तिच्या हातापायांवर मेंदीने खास प्रकारचं रंगकाम केलेलं होतं. प्रेमकूजनात त्यांचा प्रवास (हनीमून) सुखकर होत होता. चित्रपटात एखादे प्रेमदृश्य सतत पहावे त्याप्रमाणे माझ्यासमोरचे जोडपे स्थिरावले होते. मधूनच वर आणि वधू यांच्यांत काहीतरी सुखसंवाद होई नी मग त्यांचं ते मनमोकळं हसणं पाहणाऱ्यांच्या मनातही सुखद चांदणं फुलवून जाई.

खिडकीत बसलेल्या ह्या जोडप्याच्या मागील बाजूचे धावते सृष्टिसौंदर्य तर अतिशय विलोभनीय होते. पृथ्वीने सर्वत्र हिरव्यागार रंगाची उधळण केली होती. रेल्वेमार्गावर दुतर्फा पाण्याची छोटीछोटी डबकी नी त्यात कमळांची वाऱ्यावर डोलणारी फुले पाहून मन मोहरून जात होते. आजपर्यंत इतक्या दूरवरच्या केलेल्या प्रवासात मी इतके मनमोहक दृश्य जगाच्या कल्पांतापर्यंत पाहिले नव्हते. पहात रहावे असे मला वाटले पण कुठल्याही प्रवासाला अंत असणारच. आयुष्याचा प्रवासही कुठेतरी, केव्हातरी, संपणारच. पण त्यातील हे सुखद् क्षण मात्र माणसाची सोबत करीत राहतात.

सकाळी साडेदहाच्या सुमारास आम्ही जगन्नाथपुरीला पोचलो. स्टेशनवर आम्हाला उतरून घेण्यासाठी शेकडो पंड्या मंडळी हजर होती. प्रत्येकाने गाडीतच आम्हाला गाठले.

'आपका नाम क्या ?' एका लाल पंचेवाल्यानं मला विचारलं.

'आप कहासे आये ?' दुसऱ्यानं लगेच विचारलं. एक नव्हे शेकडो तोंडानं आमच्यावर प्रश्नांचा भडिमार झाला.

'देखो भाई, हम यात्रा करनेके लिये यहाँपर नही आये. सीर्फ कोणार्क देखनेके लिए आये है। हमे कोई पंड्यामहाराजकी जरूरत नही.' मी सगळ्यांना राष्ट्रभाषेत एकदम उत्तर दिलं.

'आप तीरथस्थानपर आये है तो यथाशक्ति देवदर्शन कर जाना साब.' एकानं मला अधिकारवाणीनं सुचवलं.

'रिक्शा चाहिये साब ?' रिक्शावाल्यानं मला विचारलं.

'ह !' मी म्हणालो.

रिक्शावाल्यानं आमचं सामान रिक्शात ठेवलं. 'कहा जाना है ?' त्यानं अदबीनं विचारलं.

'कोई धरमशाला है ?' मी म्हणालो.

'हा है.' तो म्हणाला.

आम्ही थोडं दूर गेल्यावर एका धर्मशाळेजवळ आलो. तेथे आम्हाला पुन्हा तुळतुळीत गोटा केलेल्या दहाबारा पंड्या मंडळींनी गाठलं.

'सब धर्मशाला भरेली है. कोई खाली नही।' आम्ही रिक्शातून खाली उतरून चौकशी करण्यापूर्वीच आम्हाला रोखठोक उत्तर मिळालं.

'झूट हो तो जाके देखो।' एकानं दम भरला. आम्ही चौकशीला जाण्यापूर्वीच तो तेथे जाऊन पोचला. आमच्याकरता धर्मशाळेचा दरवाजा बंद झाला.

पंड्यांची जगन्नाथपुरीवर केवढी सत्ता आहे याची प्रचीती मला ताबडतोब आली. पंड्यांच्याविरुद्ध जाण्याची गावातील कोणाही इसमाची छाती झाली नाही. कुणातरी पंड्याच्या घरी उतरल्या शिवाय आम्हाला गत्यंतर नव्हते. अन् तसे करायचे म्हणजे कमीतकमी शे–दोनशे रुपयांना चाट लागणार ! अन् मुख्य मुद्दा म्हणजे धर्माच्या नावाखाली अशी

ही भाविकांची लूट करण्याचा त्यांना काय अधिकार असणार? मला पंड्यांची ही 'डिक्टेटरशिप' मुळीच आवडली नाही.

'सब धर्मशाला भरेली है, अब कहा जाओगे बाबा?' मी अडचणीत आलो असं समजून एका वृद्ध पंड्यानं साळसूदपणे मला विचारलं.

'चलो कोई होटल जायेंगे!' मी रिक्षावाल्याला नवाबी थाटानं फर्मावलं. पंड्यांच्या हाती सापडण्यापेक्षा एखाद्या हॉटेलात उतरणं मला अधिक सयुक्तिक वाटलं.

जगन्नाथाच्या मंदिरापासून थोड्या अंतरावर सी–बीचवर काही छानछान हॉटेल्स होती. त्यापैकी 'व्हिक्टोरियन क्लब' या हॉटेलात आम्ही आपलं सामान ठेवलं. हॉटेलची इमारत खूप प्रशस्त व खोल्या मोठ्या होत्या. एका कोपऱ्यात बसलेला बंगाली मालक दिसायला काहीसा उग्र नी भीतिदायक होता. इमारत ब्रिटिशांचे काळातील असावी. ती बरीचशी काळ्या लाकडी तुळयांवरच आधारलेली होती. हॉटेलचे छप्परही खूपच उंच होते.

मी हॉटेलचे दर विचारून घेऊन एक खोली ताब्यात घेतली. दोन दिवसांचा प्रवास झाल्यामुळे मन नी शरीर थकून गेले होते. हॉटेलचे तोंड समुद्र किनाऱ्याकडे असल्यामुळे समुद्रावरून येणारे गार वारे नी लाटांचा घोंगावणारा आवाज मनाला हलकीशी सुखद् जाणीव देत होता. बिहार-प्रमाणेच ओरिसा राज्यातही बंगाली लोकांचेच अधिक वर्चस्व असावे. कारण हॉटेले बंगाल्यांचीच होती. आमच्या हॉटेलचे स्वरूप काहीसे क्लब-सारखे होते. १२ ते १ च्या सुमारास निरनिराळी बंगाली जोडपी मुला बाळांसह भोजनाला येऊ लागली. आम्हीही जेवायला टेबलावर खाली हॉल मध्ये आलो. माशांचे निरनिराळे प्रकार व भात ही नेहमीची जेवणाची तऱ्हा. मला व सौ.ला पोळीशिवाय होत नव्हते. आम्ही आचाऱ्याला बोलावून त्याच्याकडून आम्हाला पाहिजे ते पदार्थ करून घेतले. त्यानेही ते मोठ्या तत्परतेने करून दिले.

पुरीला जगन्नाथाचे दर्शन घेण्यास सायंकाळी आम्ही देवळात गेलो. देऊळ अतिशय प्राचीन व कलापूर्ण आहे. पंड्या व ब्राह्मण लोकांची एकच झुंबड उडाली होती. आम्ही आरतीच्या वेळी हजर असल्यामुळे जगन्नाथाचं सुंदर रूप आम्हाला पहायला मिळालं.

प्रसादाचा एक विलक्षण प्रकार आम्हाला पहायला मिळाला... येथे गाडग्यामडक्यातून प्रसाद शिजवला जातो व तो तसाच्या तसाच वाटला जातो. ती गाडगी आपण पैसे देऊन विकत घ्यायची अन ब्राह्मणांना दान करायची. त्यातला प्रसादही (ब्राह्मणाने उष्टावलेला) घरी आणायचा.

मला प्रसाद उष्टावणारे किळसवाणे दृश्य पाहवले नाही. मी तो साराच्या सारा प्रसाद त्या ब्राह्मणाला दान केला. तो भुकेला ब्राह्मण सुमारे दोन तास आमच्या पाठी लागला होता. तो दिवसभर उपाशी होता. प्रसाद खाताना त्याला किती भूक लागली होती, हे त्याच्या बकाणे भरून खाण्याच्या पद्धतीवरून कळून आले होते. भारतातील एका सुप्रसिद्ध चार धामांपैकी जगन्नाथाच्या मंदिरातील ही पंड्याची प्रथा जेव्हा बंद होईल तो सुदिन समजायचा.

जगन्नाथाचे दर्शन व दुसरे दिवशीचे कोणार्क–भुवनेश्वर–दर्शन घेऊन बसचे रिझर्वेशन करून आम्ही पुन्हा आमच्या व्हिक्टोरियन क्लबमध्ये पोचलो तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. सी–बीचवर एक फेरफटका मारून व सायंकाळचे भोजन घेऊन आम्ही आपापल्या बेडवर आडवे झालो तेव्हा समुद्राचा घोंघावणारा आवाज मोठामोठा होत कर्णरंध्रात एकसारखा घुमत होता.

# अतिपूर्वेकडील अपूर्वाई : कोणार्क ४

कोणार्क–भुवनेश्वर साईट सिइंग बसमध्ये मी व सौ. आपापल्या जागेवर बसलो. बस अगदी आरामशीर असल्यामुळे मनाला खूप बरे वाटले. बसमध्ये भारतातील सर्व जातींचे, धर्मांचे तसेच विदेशी लोकही होते. बस सुरू झाली अन् एका गुजराती जोडप्याला त्यांनी अगोदर सांगितलेल्या जागेवर बसण्यासाठी सीट मिळाली नाही. साहजिकच त्या धनिक माणसाचं पित्त खवळलं. त्याला ठरलेल्या जागी बसविल्याशिवाय बस पुढे जाऊ देणार नाही असा त्याचा निर्धार होता. मोठ्या मुष्किलीने दादा-बाबा करून त्याला खिडकीजवळची जागा करून देण्यात आली अन् बस सुरू झाली. बसमध्ये पंखे, रेकॉर्ड–प्लेयर वगैरे करमणुकीची साधने असल्यामुळे वेळ उत्तम प्रकारे जात होता.

बस सुरू होताच गाईडने आपल्या भरदार आवाजात आजूबाजूच्या प्रदेशाची माहिती सांगावयास सुरवात केली. पुरी ते कोणार्क ह्या रस्त्यावर दोन्ही बाजूला हिरवीगार शेते असून ठिकठिकाणी पाण्याचे तलाव साचलेले होते. तलावात सर्वत्र पांढरी व लाल रंगाची कमळफुले उमललेली होती. बस संथ गतीनं प्रवास करीत होती. बसमधल्या रेकॉर्ड–प्लेयरवर सुंदरसुंदर सिनेमागाणी वाजत होती.

'हॅलो...हॅलो...आपली बस आता पुरीपासून १५ कि. मीटर दूर आलेली असून लौकरच 'साक्षी गोपाल' नावाचं एक गाव आपल्याला लागणार आहे. या गावात 'साक्षी गोपाल'चं एक सुंदर देवालय आहे. 'साक्षी गोपाल' हे नाव कसं पडलं तीही एक कथा आहे. ती कथा मी आता तुम्हाला सांगतो, ती तुम्ही लक्षपूर्वक ऐका.'

गाईडने ती कथा सांगायला सुरवात केली.

‘श्रीकृष्णाचा एक परमभक्त आपल्या एका मित्रासह वृंदावन येथे श्रीकृष्णाच्या देवळात दर्शन करायला म्हणून गेला. त्या भक्ताला श्रीकृष्णाने साक्षात दर्शन दिले. तेव्हा त्या परमभक्ताने काकुळतीने त्याला विनवले, ‘ हे परमेश्वरा, मी पुरीसारख्या दूरच्या प्रदेशातून तुझे दर्शन घ्यायला आलो आहे. माझ्या वृद्धापकाळामुळे मला यापुढे तुझे येथे येऊन दर्शन घेणे जमेलसे वाटत नाही. तेव्हा तू दयावंत होऊन माझ्याबरोबर माझ्या गावी चल.’ परमेश्वराने ही गोष्ट मान्य केली, परंतु एक अट घातली. मी तुझ्या मागोमाग येतो, परंतु तुझ्याबरोबर तुझा मित्र आहे. त्याने जर मागे वळून पाहिले तर मात्र माझं दगडात रूपांतर होईल.’

त्या परमभक्तानं ही अट मान्य केली अन् आपल्या मित्राला बजावून सांगितलं की, ‘बाबा रे, आपल्याबरोबर साक्षात् गोपाल आपल्या गावी यायला तयार झाला आहे. तो आपल्या मागेमागे येणार आहे. पण त्यानं एक अट घातली आहे, तू मागं वळून बघायचं नाहीस. जर का बघितलंस तर मात्र तो शामसुंदर तत्काळ दगड होऊन पडेल. त्या भक्ताच्या मित्रानं ही अट मान्य केली. ‘परमेश्वर कसला आपल्या मागं येतो ?’ तो आपल्या मनात म्हणाला. ठरल्याप्रमाणे तो परमभक्त आपल्या मित्रासह पुरीजवळ साक्षीगोपाल या गावी येऊन पोचला. त्याच्या मागे मागे श्रीकृष्णही आपली सुमधुर बासरी वाजवत नाचतनाचत येत होताच. पण हे फक्त त्या भक्तालाच दिसत होते. त्याला अतिशय आनंद होत होता. त्याच्या मित्रानं शेवटी न राहवून त्या भक्ताला, प्रश्न केला ‘ गोपाळ आपल्या मागं आहे का ?’

‘आहे.’––त्या परमभक्तानं उत्तर दिलं.

‘कुठाय ?’ मित्रानं विचारलं.

‘मागे मागे येतोय.’

न राहवून त्या मित्रानं मागे पाहिलं अन् झालं, त्या श्यामसुंदराचं ताबडतोब एका सुंदरशा मूर्तीत रूपांतर झालं. ती सुंदर काळ्या दगडात कोरलेली मुर्ति आज ‘साक्षीगोपाल’च्या मंदिरात उभी आहे. सोबत राधा अन् इतर गवळणी हार घेऊन उभ्या आहेत. मला हे देवालय अतिशय आवडलं.

ओरिसा राज्यातील ‘ साक्षी गोपाल ’ मंदीर हा सौंदर्याचा विलक्षण मनोहारी नमुना आहे, याचं मला दर्शन झालं.

ह्या मूर्तीचं एक वैशिष्टय असे की, तिचे जे फिनिशिंग आहे ते इतके सुंदर आहे की मूर्तीवर जर हात ठेवला तर तो आपोआप घसरून खाली येईल. कदाचित हात ठेवलाच जाणार नाही इतकी ती गुळगुळीत आहे. पुरुष-भर उंचीची मूर्ती सुवर्णालंकारांनी खूप सजवलेली असते. राधेची हातात हार घेतलेली मूर्ती तर विलक्षण विलोभनीय आहे. वेळ फारच थोडा असल्यामुळे ‘ साक्षी गोपालला ’ शक्य तो डोळयात साठवत, पुन्हा पुन्हा मागे वळून पहात आम्ही बसमध्ये बसलो अन् बस सुरू झाली.

यापूर्वी पिपली नावाचे एक खेडे आम्हाला लागले. तेही ‘ ॲप्लिक वर्क ’ करता सुप्रसिद्ध आहे. विविध रंगांच्या कापडांच्या तुकडयापासून पिशव्या, बटवे अशा नानाविध प्रकारच्या वस्तू तेथे बनवलेल्या मिळतात. ॲप्लिक वर्कचे एवढे मोठे सेंटर साऱ्या भारतात कुठेही नाही असा त्या खेडयाचा दावा आहे. त्या ठिकाणीच माझी एका विदेशी तरुणीशी ओळख झाली. गोबऱ्या गालाची, गोरीमोरी, पिंगट केसांची अंगावर हरे राम हरेकृष्ण अशी अक्षरे कोरलेली साडी ओबडधोबड नेसलेली ती तरुणी, आपल्या मित्रा-बरोबर भारत बघायला हिंडत होती. तिला पिपलीचे ॲप्लीक वर्क अतिशय आवडले. मलाही आवडले होतेच. मी अन् ती आम्ही दोघेही मनाजोग्या वस्तू खरेदी करण्याकरता बाजारपेठेत हिंडत होतो. तिने एक सुंदरसा बटवा घेतला, मी एक गळयात टांगता येण्यासारखी पिशवी घेतली. पिपलीला दहा-पंधरा मिनिटांचा स्टॉप होता. आम्ही वस्तू खरेदी करीत असतानाच आमच्या बसने हॉर्न दिला अन् मग त्या विदेशी तरुणीची साडी सांभाळतासांभाळता बस पकडण्याची घाईगडबड पाहून माझी हसताहसता मुरकुंडी वळली. अंगानं ती स्थूल असली तरी पळण्यात अतिशय चपळ होती. बसपाशी येऊन पोचेपर्यंत मात्र ती हरे राम हरे कृष्ण साडी पूर्णपणे तिच्या देहापासून विलग झाली. सुटून गेली. अर्थात आतमध्ये फ्रॉक होता म्हणून बरे ! मी हसू लागताच सगळे प्रवाशी हसू लागले. ती विदेशी तरुणीही हसू लागली. तिचा तो खेळकरपणा पाहून मला फार मौज वाटली.

पिपली, साक्षी गोपाल ही ठिकाणे पाहून आम्ही कोणार्कच्या रस्त्याला लागलो ! कोणार्क टेंपल बघून तेथेच जेवण नी थोडी विश्रांती घेऊन गाडी भुवनेश्वरकडे जाईल असे गाईडने आम्हाला अगोदरच सांगितले. कोणार्क टेंपलला खाजगी गाईड नेण्याला मनाई असल्यामुळे आमच्या गाईडने आम्हाला 'सूर्यमंदिरा'ची जास्तीत जास्त माहिती आगाऊच देण्याचा प्रयत्न केला. परंतु मंदीर बघतानाही गाईडची जरूर होतीच नी तो घ्यायचा असे मी मनोमनी ठरवले होते.

कोणार्क बस स्टँडवर आम्ही उतरलो. एका गाईडने घासाघीस करून रु. पाच दर ठरवून घेतला नी आम्हाला मंदिराची सारी माहिती तो स्टँड–पासूनच पुरवू लागला. हिंदू धर्मावर बौद्ध धर्माचा पहिला विजय झाला व त्यानंतर हिंदू धर्माची विजयपताका पुन्हा फडकायला सुरवात झाली. इ. स. चे तेरावे शतक असावे ते. काही हिंदू राजे त्या वेळी मोठमोठे सम्राट होते. कोणार्कचा राजाही मोठा बलवान नी शक्तीमान होता. त्याने सूर्यदेवतेचे एक मोठे मंदीर बांधण्याचा चंग बांधला. सूर्य ही हिंदूंची आद्य देवता आहे. वेदांत सर्वप्रथम सूर्याची उपासना केलेली आहे. या मंदिराचे काम सुमारे दोन पिढ्या चालू होते. या मंदिरावर कळस बसत नव्हता. ती आख्यायिका मोठी मजेदार होती.

पहिल्या पिढीच्या मजुराने मंदिराचे कामकाज चालू केले, तेव्हा त्याची बायको गरोदर होती. मंदिराचे काम जवळजवळ पूर्ण झाले तेव्हा तिला मुलगा होऊन तो सोळासतरा वर्षाचा झाला. वृद्धत्वामुळे मुलाचा बाप कळसाचे काम करू शकत नव्हता. म्हणून ते काम मुलाने पुढे चालू केले. मंदिराला मात्र काही केल्या कळस चढत नव्हता. मंदिराचा पाया खोदला तेव्हा बळी दिलेला नव्हता म्हणून कळस पूर्ण होत नाही असा अनेकांचा समज होता. बळी दिल्याशिवाय मंदिराचा कळस पूर्ण होणार नाही तेव्हा काय करायचे हा प्रश्नही मुलाला पडला. तरी पण त्याने नेटाने कळस चढवायचे काम चालू ठेवले. शेवटी त्याच्या सुदैवाने की दुर्दैवाने कळस चढण्याचे काम पूर्ण झाले, पण तो मुलगा तोल जाऊन कळसावरून खाली पडला व अशा रीतीने बळी गेला. त्या वेळी त्याची बायको गर्भारशी असते.

अशा तऱ्हेच्या कितीतरी प्रकारच्या आख्यायिका या मंदिराभोवती गुंफलेल्या आहेत. काहीही असले तरी या मंदिराचे शिल्पकाम अतिशय प्रेक्षणीय असून कोरीव काम बघत राहण्यासारखे आहे. उडिया शिल्पकामाची एक वेगळी पण विलक्षण छाप मंदिराच्या मूर्तींच्या चेहऱ्यांवर व आकृतीवर पडलेली आहे. इंजिनिअरिंग कामामधील विविधता व त्यातील खाचाखोचा जेव्हा आम्हाला गाईड समजावून सांगू लागला त्या वेळी आम्ही आश्चर्याने थक्क झालो. अगदी प्रवेशद्वाराची रचनाच आश्चर्यकारक आहे. पूर्वेला सूर्य उगवताच. त्याचं पहिलंच किरण सूर्यमूर्तींच्या चेहेऱ्यावर पडावं अशी उन्हाळ्यात, पावसाळ्यात किंवा हिवाळ्यात ऋतूप्रमाणं सूर्वदेवतेने जरी आपली उगवण्याची जागा बदलली तरी प्रवेशद्वारावरील तीन छिद्रापैकी एका छिद्रातून ते नेमकं मंदिरातील सूर्यमूर्तीच्या चेहऱ्यावर पडेल अशी तीन छिद्रांची योजना करण्यात आली होती. आम्हाला गाईडने प्रवेशद्वाराजवळ उजव्या बाजूस, मध्यभागी व डावे बाजूस उभे केले. या तिन्ही ठिकाणांहून आम्हाला समोरचे सूर्यमंदीर मात्र केन्द्रबिंदूच वाटले. खरे म्हणजे डावे बाजूकडून किंवा उजवे बाजूकडून बघितल्यास समोरचें मंदीर थोडे वेगळे कोणातून दिसायला हवे पण तसे घडत नाही. ‘कोणार्क’ हे नाव या मंदिरास किती सार्थ आहे याचे उत्तम स्पष्टीकरण या प्राचीन इंजिनियरिंगच्या कल्पकतेतून आपणास मिळते.

या सर्वच मंदिराचा आकार रथासारखा आहे. त्याला आठ चाके असून त्या प्रत्येक चाकाला चौतीस आऱ्या आहेत. पळे, घटका दर्शवणारे लहानलहान मणी व ऋतूची कल्पना येण्याकरता धावा आहेत. सूर्योदय, मध्यान्ह व सूर्यास्त दाखवताना मंदिराच्या तीन भागांवर भास्कराचे तीन पूर्णाकृती पुतळे आहेत. सूर्योदयाचा पुतळा हसतमुख आहे, तर सूर्यास्ताचा अगदी दमलाभागलेला आहे. ही तीनही रूपे अगदी स्पष्ट आहेत. प्रकृती आणि पुरुष यांचे मीलन दाखवणाऱ्या कलाकृती ठिकठिकाणी कोरलेल्या आहेत. इ. स. तेराव्या शतकातील शृंगारदर्शन काही कलाकृतीतून दिसते. अर्थात शृंगार आणि रूपसौंदर्य यांचा मिलाफ झाला की माणूस भाव विश्वात विलीन होतो. पूर्वीही होत आला आहे आणि आताही होतो. त्यात विशेष काही नाही.

# अतिपूर्वेकडील अपूर्वाई : कोणार्क ५

कोणार्कचे सूर्यमंदीर हे जगातील स्थापत्यशास्त्राचा एक अजब नमुना आहे. मदुराई, रामेश्वर, खजुराहो यांतील भव्योदात्त तत्त्वे त्यात तर आहेतच पण लोहचुंबकाचा इतका सुंदर उपयोग इ. स. च्या तेराव्या शतकात होऊ शकला याचे आश्चर्य वाटण्याजोगे हे उदाहरण आहे.

या मंदिरातील एका मोठ्या हॉलमध्ये सूर्यनारायणाची मूर्ती पूर्वी अधांतरी टांगती होती. ती सूर्यकिरणांच्या प्रवासाप्रमाणे फिरत असे अशी आख्यायिका आहे. लोहचुंबकाच्या तत्त्वावर ही गोष्ट अशक्य नाही. आता ती मूर्ती लंडन म्युझियममध्ये विराजमान आहे असे समजते. तेराव्या शतकातील विज्ञान इतके पुढे गेलेले असले तर तीही एक महान बाब आहे. कोणार्कच्या प्रवेशद्वारावरच हिंदू व बौद्ध धर्माची प्रतीके दर्शवलेली आहेत. हिंदू धर्मावर बौद्ध धर्माने व नंतर बौद्ध धर्मावर हिंदू धर्माने केलेले आक्रमण हत्ती व वाघांच्या रूपाने दर्शवलेले आहे. आवारातील हत्तीचा एक भव्य पुतळा तर इतका प्रमाणबद्ध आहे की जिवंत हत्तीच तेथे उभा आहे की काय अशी शंका यावी. श्रृंगारिक लहानलहान चित्रकृतींमध्ये विलक्षण तन्मयता आलेली आहे. एकूण कोणार्कचे सूर्यमंदीर हे जगातील एक महान आश्चर्य आहे. आमच्या गाईडने आम्हाला सविस्तरपणे सूर्यमंदिराची रचना व माहात्म्य समजावून सांगितले. मलाही हवे असलेले सर्व फोटो घेऊन मंदिराला डोळ्यांत साठवतसाठवत आम्ही सारे पुन्हा बसस्थानकावर येऊन पोहोचलो. आता पोटात सपाटून भूक लागलेली होती. आमच्या पुरीच्या क्लबने मेसेज पाठवून आमची कोणार्क येथेही जेवणाची व्यवस्था करून ठेवलेली होती.

आम्ही शाकाहारी भोजन घेणारे असल्यामुळे त्या हॉटेलवाल्याला आमच्याकरता मुद्दाम गहू, बटाटे, तुरीची डाळ वगैरे जिन्नस मागवावे लागले होते. त्याचा तो अदबशीरपणा व त्याने सहानभूतिपूर्वक आमची जेवणाचे वेळी केलेली विचारपूस मला आठवते. लठ्ठ पोटाचा तो ब्राह्मण माणूस अगत्यपूर्वक 'यजमानगिरी' करीत असताना पाहून आपण कुणी वरपक्षाचे तर नाही ना अशी एक शंका मला यायला लागली.

'अम्मा दाल कैसी, रोटी कैसी, शाक कैसा?' तो लंबोदर सौ.ला वारंवार विचारत होता.

'बहुत अच्छी, बढीया' सौ. त्याला सांगत होती. खुश होऊन मग तो अधिकच दाल, रोटी, शाक आमच्या पानात वाढत राहिला. कारण ते मराठी खाणं आमच्याशिवाय कुणी खाणार नव्हतं.

'बाबुजी, लेव बटाटा भाजीं अच्छी है।' मलाही त्या भोजनगृहाच्या मालकानं अदबीनं आग्रह करून म्हटलं.

'ठीक है, ठीक है' मी म्हणालो. पण महाराज अभी पेट बहूत भर चुका है, पेटमें जगा नही है!'

'आपका पेट भर गया. हमको संतोष हो गया.' तो इसम हात जोडून म्हणाला.

मराठी देशातून आलेला एक इसम आपल्या हॉटेलच्या अन्नानं तृप्त झालेला पाहून त्या हॉटेलमालकाला जो आनंद झाला तो त्याच्या भल्यामोठ्या जबड्यातून बाहेर पडला. त्याची सारीच्या सारी अक्राळविक्राळ दंतपंक्ती दाखवून तो म्हणाला, 'बहोत अच्छा, हमको संतोष है।'

माझ्यावर झालेलं त्याचं लक्ष विकेंद्रित करण्याकरता मी त्यांना म्हटलं, 'देखो महाराज, वो जो गोरी गोरी मड्डम वहाँ बैठी है ना– उसका तुम अच्छी तरह समाचार लेव. वो परदेशी, है– हॉं, विदेशी है। अन् माझी मात्रा बरोबर लागू पडली. तो महाराज ताडकन् विदेशी तरुणीजवळ पोचला. तिला काही हवंनको याची तातडीने चौकशी करू लागला. दुर्दैव त्याचं की माझं पण ती तरुणी यावेळेपर्यंत जेवण संपवून सिग्रेट फुंकत

बसली होती. तिच्याबरोबर तिचा बॉयफ्रेंडही गप्पा मारत बसला होता. मी लगबगीनं हात धुवायला उठलो. यावेळेपर्यंत बसकडे उतारूंची जा ये चालू होती. जाताना शहाळ्यातील गोड पाणी पिऊन आम्ही कोणार्कहून इतर प्रेक्षणीय स्थळे पहावयास निघालो. आता आम्ही भुवनेश्वरेकडे कूच करीत होतो. त्यापैकी मध्येच लागलेले धवलगिरी हे बुद्धाचे स्तूप पहावयास आमची गाडी थांबली. प्रचंड आकाराचे पांढरेशुभ्र स्तूप व त्यामध्ये बुद्धाची तितकीच प्रचंड मूर्ती पाहून मला आश्चर्य वाटले. गौतम बुद्धाच्या जीवनोतील काही ठळक प्रसंगांचे कोरीवकाम स्तूपाच्या खालच्या बाजूस गोलाकार केलेले होते. प्रवेशद्वाराजवळ एक बौद्ध भिक्षुक (जपानी) हातात एक ठोका घेऊन एक पडघम अहोरात्र वाजवत बसलेला होता. तोंडाने बौद्धधर्माच्या पाली भाषेतील गुणगान तो मोठ्या तन्मयतेने करीत होता. आम्ही आतमध्ये गेलो व त्याचे दर्शन घेतले. त्याने मग एका हाताने साखरफुटाणे प्रसाद म्हणून दिले. माझ्याबरोबरची ती विदेशी मैत्रीण त्या खोलीमध्ये यायला कचरली. तिला साखरफुटाणे प्रसाद म्हणून दिले तेव्हा तिने तो प्रसाद घेण्याकरता डावा हात पुढे केला. मी मात्र तिचा उजवा हात पुढे करायला लावून त्यावर ते साखरफुटाणे ठेवले तेव्हा ती खूप खुश झाली.

सम्राट अशोकाने (सीरा २७२–३६ बी सी) कलिंग देशावर स्वारी केली तेव्हा प्रचंड मानवसंहार झाला. तो संहार पाहून त्याचे मन द्रवले शेवटी त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. कलिंग वर्ल्ड पीस पॅगोडा म्हणून 'कलिंग निप्पन बुद्ध संघानं' ही प्रचंड वास्तू जपानी शिल्पशास्त्रज्ञाच्या मदतीने नवीनच बांधली आहे. ह्या स्तूपाचा पांढराशुभ्र रंग उन्हामध्ये अगदी चम–चम करीत असतो. गौतम बुद्धाचे ते शांत रूप व तेथील गंभीर वातावरण माणसाच्या मनावर उदात्ततेचा परिणाम केल्यावाचून रहात नाही.

धवलगिरीवरून आम्ही आता भुवनेश्वरच्या मार्गाला लागलो. सुमारे साडेतीनचारच्या सुमाराला आम्ही भुवनेश्वर ह्या ओरिसाच्या राजधानीत प्रवेश केला. भुवनेश्वरचे जुने शहर व नवे शहर असे दोन भाग दिसतात. जुने भुवनेश्वर म्हणजे सुमारे ३००० देवळाचा एक परिसर आहे. भुवनेश्वर शहराला 'देवळांचे शहर' म्हणतात ते काही खोटे नाही. त्यापैकी लिंगराज

देऊळ हे ११ व्या शतकात बांधलेले एक प्रचंड देवालय असून त्याची बांधणी अतिशय भक्कम आहे. देवळातील कोरीवकामही त्यावेळच्या शिल्पशास्त्रातील प्रगतीचे प्रतिनिधीत्व करते. अर्ध्या तासाच्या विश्रांतीनंतर आम्हीं ओरिसा सरकारने मुद्दाम तयार केलेल्या 'नंदन कानन' या उद्यानात गेलो. हे कानन शहरापासून बरेच दूर आहे. एक हजार एकराच्या या राखीव जागेत नयनमनोहर पार्क असून सुंदर सुंदर झाडे व विविध हिंस्त्र प्राणी पाळलेले आहेत. वाघ, सिंह, तरस, हरण, मगरी, अजगर यांना त्यांच्या नैसर्गिक अवस्थेत ठेवलेले असल्याने (पिंजऱ्यात न ठेवता आजूबाजूला खंदक खणून मोकळे सोडलेले आहे.) प्रत्यक्ष जंगलात गेल्यासारखे वाटते.

१३४ एकर जागेत एक मोठे सरोवर असून त्यात बोटिंगचीही व्यवस्था केलेली आहे. बागेतून एक छोटीसी 'फुलराणी' (आगगाडी) सोडण्यात येते असल्यामुळे बाबा–लोकांना खूप मौज वाटते.

आमच्याबरोबर असलेला गाईड आम्हांस सर्व प्रकारच्या फुलझाडांची अन् प्राण्यांची माहिती पुरवीत होता. माझी विदेशी मैत्रीण प्राण्यांचे निरनिराळे फोटो निरनिराळ्या अँगलसने घेण्यात मशगुल झाली होती. एक लांब चोचीचा मोराएवढा सुंदर पक्षी झाडावर बसला होता. पण तो फार चंचल होता. त्या विदेशी तरुणीला त्याचा काही केल्या फोटो घेता येईना. ती त्याच्या जवळ फोटो घ्यायला गेली की तो मान हलवायचा अन मग फोटोचा अँगल बदलायचा. मग तीही आपली दिशा बदलायची. सुमारे दहा मिनिटे दोघांची ही जुगलबंदी चालू होती. शेवटी तिने फोटो काढलाच. तिच्या चेहेऱ्यावरचे फोटो काढल्यानंतरचे ते विजयी स्मित पाहून मला खूप नवल वाटले. एका प्राण्याच्या एका विशिष्ट अँगलकरता तिने आपले सारे फोटोग्राफीचे कौशल्य पणाला लावले होते. फोटोग्राफीकरता चिकाटी हा गुण किती आवश्यक आहे याची मला त्यावेळी जाणीव झाली. कारण मला फोटो काढायला फारसा वेळ लागला नाही. मी त्या सुंदर पक्ष्यांचे घेतलेले फोटो काळे कुळकुळीतच का आले याचे कारण मला नंतर समजले अन् माझ्या फोटोग्राफीची शोकांतिका झाली.

आता फिरताफिरता आम्ही एका मोठ्या भिंतीजवळ येऊन पोचलो. त्या भिंतीवर वाघनखांचे ठसे होते. शकुंतला आणि प्रदीपच्या स्मरणार्थ म्हणून एक छोटी समाधीही होती. साहजिकच प्रवाशांचे कुतूहल वाढले. 'ये क्यां है जी ' प्रत्येकजण गाईडला विचारू लागला अन मग गाईड वाघ–वाघिणीच्या त्या लैला–मजनू जोडीची कथा रंगवून सांगू लागला. सारे प्रवासी कान टवकारून ती कथा ऐकू लागले.

' ह्या जंगलात अनेक वाघ–वाघिणीच्या जोडया (नर–मादी) आहेत त्यामध्ये प्रदीप (वाघाचे नाव) आणि त्याची बायको हीही जोडी होती. अनेक वर्षे या जोडीचा संसार सुखाने चालू होता. एक दिवस मात्र एक नवीन तरुण वाघीण ह्या जोडीच्या राखीव जागेत ठेवण्यात आली. तिच्या-भोवती जंगलरीतीप्रमाणे खंदक खणण्यात आले. ह्या नवीन तरुण वाघि–णीचे नाव शकुंतला असे होते. मनुष्यप्राण्याप्रमाणेच वाघ सिंहादी हिंस्त्र प्राण्यांत प्रेमाची नाजूक भावना असते. त्यांच्यामधेही लैना–मजनूसारखे किस्से घडू शकतात हे ऐकून आमच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. प्रदीपचे लक्ष एक दिवस जवळच ठेवलेल्या शकुंतलेकडे गेले, अन काय जादू झाली कोण जाणे. तिने त्याचे हृदय चोरले. तिच्याही मनात एक गोड शिरशिरी निर्माण झाली. मग दिवसभर प्रदीप·शकुंतलेची वारंवार नजरा–नजर होऊ लागली. आता त्यांना एकमेकाच्या स्पर्शसुखाची तहान लागली. एका संध्याकाळच्या रम्य वेळी प्रदीपने आपल्या प्राणाची पर्वा न करता खंदकावरून उडी घेतली अन तो शकुंतलेकडे पोचला. थोडक्यात बचावला नाही तर प्रदीप त्या खंदकात बुडून मेला असता. मग त्याने शकुंतलेला आपल्या बाहुत घेऊन तिचे प्रेमभराने चुंबन घेतले. तीही त्याच्या बाहूंत विसावली. प्रदीप शकुंतलेजवळ महिना-दीड महिना राहिला पण जंगल–खात्याच्या त्या नोकरांना याचा पत्ता लागला नाही. प्रदीप–शकूचे ते प्रेम–संबंध अबाधितपणे चालू राहिले. दुर्दैवाने ही कुणकुण एका सेवकाच्या लक्षात आली, अन मोठ्या प्रयासाने मग प्रदीपला त्याच्या पूर्वीच्या राखीव जागेत ठेवण्यात आले. प्रदीपकुमार शकुंतलेकडे जाऊ नये म्हणून दोघांच्या जागे–

...४

मध्ये एक उंच भिंत बांधण्यात आली. पण मग हा जबर घाव शकुंतला सहन करू शकली नाही. प्रियतमाची ताटातूट तिला सहन झाली नाही. ती दुःखी झाली. तिने अन्नपाणी सोडले. आपल्या प्रियकराला भेटण्याकरता ती तळमळू लागली. प्रदीपही तिच्याकडे पाहून मूक अश्रू ढाळू लागला. एक दिवस मात्र शकुंतलेला हा विरह सहन न होऊन तिने खंदकाच्या त्या भिंतीवरून जीव तोडून उडी मारली; पण ती भिंतीपर्यंत पोचू शकली नाही. भिंतीचे काम नवीनच कच्चे असल्यामुळे विटा खचून शकुंतला पाण्यात पडली अन एक आर्त किंकाळी फोडून तिचा खंदकाच्या पाण्यात अंत झाला. प्रदीपने तिची ती किंकाळी ऐकली अन त्याचे हृदय अक्षरशः फाटले. आता त्याने अन्नपाणी वर्ज्य केले अन तो आपल्या प्रेयसीकरता झुरू लागला. दोन दिवसांतच प्रदीपही शकुंतलेला भेटण्याकरता स्वर्गात निघून गेला. तेथेच त्यांचे चिरस्थायी मीलन झाले. प्राण्यांच्या जगातील ही 'लैला-मजनू'ची कथा पुन्हा एकदा प्रेमाची महती गाऊन गेली. प्रदीप-शकुंतला यांनी प्रेमा-करता आपल्या जीवाचे बलिदान केले. कथा ऐकून सारे प्रवासी हळहळले. भिंतीवरील शकुंतलेच्या त्या 'पाऊलखुणा' अजूनही त्यांच्या प्रेमाची साक्ष देत उभ्या आहेत; जगाच्या अंतापर्यंत उभ्या राहतील.

भारावलेल्या अंतःकरणाने आम्ही पुन्हा बसमध्ये बसलो. आता बस उदयगिरी-खंडगिरी या जैनांच्या लेण्याकडे निघाली होती. खिस्तपूर्व दुसऱ्या शतकातील ही लेणी आजतागायत जशीच्या तशी उभी आहेत. आता अंधार खूपच पडला होता. हजारो पायऱ्या चढून जाऊन त्या लेणी बघायला फारसे कुणी तयार झालं नाही. चहापाणी करून सारेच प्रवासी गाडीत बसले अन गाडी भुवनेश्वर स्टेशनला थांबून तेथून पुन्हा जगन्नाथपुरीकडे कूच करती झाली. आम्ही हॉटेलात पोचलो तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते. माझ्या मनात मात्र प्रदीप-शकुंतलेची दुःखद कहाणी घोळली जात होती.

# अतिपूर्वेकडील अपूर्वाई : कोणार्क

५० ५ २९५०

सकाळ उजाडली नी व्हिक्टोरियन क्लब हॉटेलातील आमचं वास्तव्य संपवून आम्ही कलकत्ता येथे जाण्याकरता स्टेशनवर पोचलो. दहा वाजता एक पॅसेंजर होती. त्याशिवाय संध्याकाळी एकच गाडी होती. दिवसभर पुरीचा मुक्काम वाढवण्यापेक्षा पॅसेंजर गाडीनेच प्रवास केलेला काय वाईट असा (सुज्ञ) विचार करून आम्ही त्या अगदी मोकळ्या गाडीत स्थानापन्न झालो.

जगन्नाथाचं शेवटचं दर्शन घेतलं. साक्षी गोपाल आठवला. पंड्यांची गर्दी पाहिली. काही सुखद, काही दु:खद आठवणींची मनात उजळणी केली. पुरी–भाजीची खुर्दा रोडला शिदोरी घेऊन पुढच्या कंटाळवाण्या प्रवासाला लागलो. खुर्दारोडपासून गाडीमध्ये थोडी गर्दी वाढू लागली होती. खरं म्हणजे इतक्या लांबच्या प्रवासाला पॅसेंजर गाडी सोयीची नाही, हे माहीत असूनही आम्ही ती का घेतली याचा उलगडा मला झाला नाही.

पॅसेंजर प्रत्येक स्टेशनला थांबू लागली अन् गाडीत चढणारे व उतरणारे प्रवासी यांची एकच झुंबड उडू लागली. त्यात अधिक भरणा उडिया लोकांचाच होता. मधेमधे सगळा डबा रिकामा होई तर पुढच्याच स्टेशनात तो तुडुंब भरत असे. निरनिराळ्या प्रकारचे प्रवासी. त्यांचे बोलणे, चालणे वागणे चमत्कारिक असे.

कुठल्यातरी स्टेशनवर एक मुसलमान भिकारी आमच्या डब्यात शिरला. तो एका पायाने लंगडा होता. कपडे मळकट होते. दाढी वाढलेली होती.

'आप कहासे आये ?' त्यानं विचारलं.

'पूरी से.'

'यात्रा करके.'

'जी हाँ.'

'आप खुदाकेवास्ते इतना रुपीया खर्चा करते है हमारे जैसे लंगडे आदमीके लिए नही'--त्यानं मला धारेवर धरलं.

'आपका कहना क्या है ?' मी विचारलं.

'नही—कुछ नही. मै पहले पाकिस्तानमें था. १९४७ मे जब भारत आया तो मेरी सारी जायदाद लुट गयी थी. मजलदरमजल करके हम दिल्ली पहूँचे. खानेको अनाज नही था ! गाडी पैरपर जानेसे एक पैर पूरा टूट गया, क्या कहू बाबूजी--घरमें बीबी, चार बच्चों और बूढी माँ है. आप कुछ मदद करे तो--'

तो अक्षरशः ओक्साबोक्सी रडू लागला. मी. सौ. ला रुपया–दोन रुपये देण्यासंबंधी सांगितले, पण ती अतिशय धूर्त. चार आण्याचं एक नाणं काढून तिनं ते त्याला दिलं अन् वाटेला लावलं.

'खुदा तुम्हे सुखी रखे' असा नेहमीचा आशीर्वाद देऊन त्यानं अक्षरशः लंगडा पाय सरळ करून पलायन केलं. तो भिकारी गाडीतल्या सर्वांच्या परिचयाचा होता व त्याचं हे ओक्साबोक्सी रडणंही त्यांना ठाऊक होतं. नवीन प्रवाशाला मात्र ते हृदयद्रावक वाटे नी त्याचं मन द्रवत असे. असा माणूस त्याला काही ना काही मदत करी, हे मला गाडींतील प्रवाशांकडून मागाहून कळलं. फार थोडक्यावर निभावलं असं मनाशी म्हणून सुटकेचा निःश्वास टाकला. कारण काही का असेना, पण मी त्या भिकाऱ्याच्या अभिनयसामर्थ्यानं चकित झालो होतो. त्याच्या अभिनयाबद्दल तरी त्याला काही तरी मदत करावी असं मला मनोमन वाटलं होतं.

कटक जंक्शन आलं अन् गाडीचा डबा भरला. मी बाकड्यावर पाय पसरून जरा आडवा झालो होतो तोच उडियाच्या एका भल्याथोरल्या जथ्यानं मला उठायला भाग पाडलं. मी उठलोही नसतो, पण एका चोळी नसलेल्या षोडशीनं मला हलवून जागं केलं अन् ती मधाळ स्वरात म्हणाली.

'बाबूजी सोता है ! उठो, बैठनेको जगा नही !' ती बोलली तेव्हा मंजुळ घंटेचा किणकिणाट माझ्या कानांत गुंजला. मी ताडकन उठलो अन तिला जागा करून दिली. मला उठवण्याकरता ती माझ्यासमोर ओणवी

उभी होऊन होती. तिचा पदर ढळलेला होता. चोळी नसल्यामुळे तिचे पुष्ठ उरोज ठसठशीतपणे दिसत होते. मला ते दृश्य बघायला बरं वाटलं तरी शहरी सुसंस्कृतपणाचं ते लक्षण नव्हतं. मी माझी नजर खाली वळवली. तिला मात्र त्याचं काहीच वाटलं नाही. ती उघडया अंगानं माझ्याजवळ येऊन अगदी खेटून बसली. गोरीगोरीपान, नाकात, कानात माफक सोन्याचे दागिने अन अंगाला वल्कलं नेसल्याप्रमाणे गुंडाळलेली साडी. ही सुटसुटीत वेषभूषा पाहून मला बरं वाटलं. अत्यंत नैसर्गिक अवस्थेतील ही साधी, सुटसुटीत राहणी मला अतिशय आवडली. तिचं वागणं निरागस होतं. मी तिला सहजपणे तिचं नाव विचारलं--

'सौती.' तिनं एक गोड मुरका मारला. गर्दीमुळं ती माझ्या अंगावर जवळजवळ रेलली होती. मी मात्र अंग चोरण्याचा प्रयत्न करीत होतो. मी तिच्याजवळचं छोटं मूल घेण्याचा प्रयत्न केला. ते कोणाचं आहे ? तिचं लग्न झालेलं आहे का ? तिला भाऊ किती, बहिणी किती, तिचे त्या घोळक्यातील आई--वडील कोण हे सारे तपशील मी उगीचच गोळा केले. उद्देश एकच, तिचे नी माझे संभाषण व्हावे.

'सौती'च्या आगमनानं आता कंटाळवाण्या प्रवासात जीवंतपणा आला तिचं ते गोड बोलणं, लाडिकपणे मुरकणं, दिलखुलास हसणं मला अतिशय आवडलं. तिचं नाव तर अतिशयच गोड होतं— 'सौती.' भारतातील आदिवासी संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारी 'सौती' मला फार फार आवडली. ती तिच्या स्टेशनवर उतरून गेल्यानंतरही कितीतरी वेळ माझ्या मनात घोळत राहिली.

काही वेळानंतर पुन्हा गाडीचा डबा मोकळा झाला. आमच्या समोरच्या बाकडयावर एक तेलंगणी जोडपं येऊन बसलं. मी त्यांच्या बोलण्याचालण्याकडे, लकबीकडे बारकाईनं पहात होतो. थोडया वेळानं नवऱ्यानं बिडी पेटवली. बाईनंही बिडी पेटवली पण नवऱ्याच्या काडीनं. नवऱ्यानं स्वत: आपल्या काडीनं बायकोची बिडी पेटवून द्यावी ह्याचं मला आश्चर्य वाटलं. मानवी जीवन आणि मूल्य यांची निरनिराळी स्वरूपं मला या प्रवासात भरपूर पहायला मिळाली. मी सिग्रेट ओढून त्याच काडीनं माझ्या बाय

कोची सिग्रेट पेटवू शकेन का ? असा एक गमतीदार विचार माझ्या मनात आला. आमची नैतिक मूल्ये वेगळीच आहेत. अर्धनग्न पोषाख अन खाण्या-पिण्यातल्या अडाणी लोकांच्या सवयी मला अतिशय आधुनिक (मॉडर्न) वाटल्या. त्यात कोणताही संकोच किंवा भीडभाड नव्हती. युरोपियन लोकांच्या बऱ्याचशा चालिरीतीशी त्या अडाणी लोकांच्या चालिरीती मिळत्याजुळत्या होत्या.

हावरा स्टेशनच्या अगोदर तीनचार स्टेशनं गाडी काही कारणानं खोळंबून राहिली ती सुमारे तीन तास. कलकत्त्याजवळ येऊनही मध्येच अडकून पडल्यामुळं प्रवास अतिशय कंटाळवाणेपणाचा होत होता. शेवटी आम्ही लोकलचा आसरा घेतला अन बारा वाजण्याच्या सुमारास हावरा (हावडा) स्टेशनवर पोचलो. आमचं सामान घेण्याकरता एक कुली ठरवला अन दोन दिवसानंतरचं रिझर्वेशन अगोदरच करून घेऊन स्टेशनजवळच हावरा हॉटेलमध्ये आमचा धामा टाकला.

# अतिपूर्वेकडील अपूर्वाई : कोणार्क ६

हावरा स्टशनवर आम्ही बाराच्या सुमारास पोचलो. स्टेशनवर मुंबई व्ही. टी. प्रमाणे गर्दीने लोकल जात-येत होत्या. जिकडेतिकडे तिकिटं घ्यायला रांगाच रांगा लागल्या होत्या.

मी व सौ. आमचं सामान एका बंगाली कुलीकडे देऊन परतीचं ॲड-व्हान्स बुकींग करण्याकरता रांगेत उभे राहिलो. अर्ध्या-पाऊण तासानंतर आम्हाला तिकीट मिळालं. तिकीट त्याच दिवशीचं रात्री ७॥ च्या मुंबई मेलचं होतं. मी घाईघाईनं तिकीट घेतलं अन आम्ही सर्व हॉटेलच्या शोधार्थ रेल्वेस्थानकाच्या बाहेर पडलो.

'बाबुजी आपको होटल ठहरना है. आपको जल्दी जाना भी तो है. स्टेशन नजीकका होटल लो तो अच्छा रहेगा'–कुलीनं सुचवलं.

आम्ही जात होतो ते प्रत्येक हॉटेल भरलेलं होतं. आम्हाला पाहिजे होती तशी खोली मिळत नव्हती. शेवटी थोडचा अंतरावर असलेल्या हावरा हॉटेलमध्ये एक खोली मिळाली. भाडंही माफक म्हणजे एका दिव-साला वीस रुपये होतं.

पुरीहून निघाल्यापासून अंग घामानं आंबून गेलं होतं. सर्वप्रथम अंघोळ करावी म्हणून हॉटेलच्या पोऱ्याला गरम पाणी करायला फर्मावलं. पण हे कलकत्ता होतं. इथं इतक्या सहजासहजी हुकूम पाळले जाणार नाहीत याची लागलीच प्रचीती आली.

'बाबूजी अभी दो बज रहे है। अभी गरम पानी नही बनेगा।'

'गरम पानी सिवा हम नहाते नहीं'--मी घुश्यातच म्हणालो.

'वो ठीक है लेकिन–'

'लेकीन क्या है?' मी लगेच खोलीत असलेला फोन उचलला अन मालकाशी कॉन्टॅक्ट करण्याचा प्रयत्न केला पण मालक जागेवरच नव्हता. बराच वेळ वाट पाहून मग दोन जिने उतरून खाली आलो अन मालकाला गरम पाणी करून देण्याबद्दल सांगितलं. 'छोकरेको बोलो' त्यानं मलाच दम भरला.

आई जेवू घालीना नी बाप भीक मागू देईना. छोकरा तर मानायलाच तयार नव्हता. 'अभी भट्टी ठंडी हो गई है।' तो मला त्याचं म्हणण पटवून देत होता. त्याचा युक्तिवाद सडेतोड होता. भट्टी बंद झाली असेल तर गरम पाणी मिळणे शक्य नाही, हे मला पटलं होतं.– पण एक निकराचा प्रयत्न करावा म्हणून मी त्याला म्हणालो– 'देखो तुमारा जो कुछ चार्ज होगा वो हमको बोलो हम देंगे मगर नहानेको पानी लाव.'

आता पोऱ्याची कळी खुलली. 'साब एक रुपिया पडेगा' त्यानं मला हळूच सांगितलं.

'कोई बात नही. दो बकेट अच्छा पानी तपाके लाव'– मी त्याला म्हणालो—

'अच्छा अभी लाया'– तो पोऱ्या जवळजवळ धूम ठोकून पळाला. पाणी आणल्यावर मी म्हणालो,

'क्यू बावा–भट्टी ठंडी हुयी थी ना. फिर इतने जल्दी कैसी गरम हुई?'

'वो तो बहाना था. क्या करे बाबुजी जमाना बुरा है।'

गरमगरम पाण्यानं मी व सौ.नं अंघोळ केली अन दोन थाळ्या भोजन पोटात रिचवून आम्ही खुशाल झोपी गेलो.

थोडा शिणवठा कमी झाल्यावर आम्ही टॅक्सी करून कलकत्ता शहर बघून येण्याचे ठरवले. स्टेशनजवळच असल्यामुळे बऱ्याच टॅक्सी उभ्या होत्या.

'कलकत्ता देखना है भाई?' मी एका टॅक्सीवाल्याला म्हणालो.

'चलिए साब.' तो म्हणाला.

'क्या लोगे भाई?'

'पुरे पचास रुपये पडेंगे.'

'पचास ?'– माझं धाबं दणाणलं.

'अहो आपण टुरीस्ट बसनंच जाऊ या ना' सौ.नं सुचवलं.

'अग पण तीन दिवस मोडतील. हॉटेलच्या तीन दिवसांचे साठ रुपये आणि जेवणाखाण्याचा खर्च वेगळा, म्हणजे शंभराच्या घरात जायचं.'

'ते खरंय हो!'

'टॅक्सीनंच कलकत्ता पाहू या!' मी म्हणालो. टॅक्सी शोधण्याकरता आम्ही थोडे पुढे गेलो.

'देखो भाई मिटरके हिसाबसे जो पैसा होगा वो हम देंगे.' मी टॅक्सीवाल्याला म्हणालो.

'अच्छा साब' म्हणून एका टॅक्सीवाल्यानं आपली टॅक्सी सुरू केली. 'पहले किधर जायेंगे' त्यानं पृच्छा केली.

'कालीघाट जायेंगे. कालीमाताका दर्शन लेंगे.'

'हॉवरा ब्रिज–म्हणजे एक प्रचंड धूडच! खालून गंगेचा विस्तीर्ण संथ प्रवाह वहात होता. ह्या ब्रिजवरून प्रचंड प्रमाणांत वाहतूक चालू असते. कलकत्त्यातील बसला मात्र काही शिस्तच दिसत नव्हती. गुळाच्या ढेपेला चिकटलेल्या मुंगळ्याप्रमाणे माणसं सार्‍या बाजूंनी वेढलेली होती. कुणालाही आपल्या आयुष्याची किंमत नव्हती.

थोडे पुढे आल्यावर एका नवीन कलकत्त्यात आलो असं वाटलं. सुंदर-सुंदर इमारती व अरुंद रस्ते, उत्तम उत्तम दुकाने व शिस्तबद्ध वहातूक यामुळे हा भाग मनोहर वाटला. कालीमातेचे दर्शन घेऊन आम्ही रामकृष्ण मिशन (बेलूर मठ) पहाण्यासाठी गेलो. याव्यतिरिक्त कलकत्ता शहरात फारसे काही पहाण्यासारखे नाही. म्हणजे मुंबई, मद्रासप्रमाणे ते एक बकाल शहर आहे.

बेलूरमठातील रामकृष्ण परमहंसांची भव्य मूर्ती, स्वामी विवेकानंदाचे देवालय व इतर आश्रमांतील निरनिराळे विभाग, गंगेच्या पवित्र काठा–वरील शांत वातावरण पाहून मन उल्हसित झाले. जगाच्या पाठीवरील असे तुरळक मंगलमय वातावरण जीवनाच्या धकाधकीपासून सामान्य माणसाची

काही काळ सुटका करते. त्याला काही वेळ एका वेगळ्याच आनंदमयी विश्वात नेऊन पोचवते. ईश्वराशिवाय हे जग चालू शकणार नाही, याची प्रचीती बेलूरमठातील ध्यानस्थ बसलेल्या परमहंसाच्या पवित्र मूर्तीला पाहिले की मनोमन पटते. आणि ॐचा साक्षात्कार व्हायला लागतो.

सायंकाळी साडेसहाच्या सुमाराला हॉटेलमध्ये पोचतो न पोचतो तोच आमचा स्टेशनवरचा कुली आमच्यासमोर दाखल झाला.

'अरे बाबू, दोपहरसे मेरेकू ठीक लगता नही. आपकी जानेकी गाडी तैयार है! चलो, जल्दी चलो?' तो कुली मला घाबऱ्याघाबऱ्या म्हणाला.

'अरे नही बाबा. हम कल जायेंगे! टिकीट कलका है.'

'बाबू आप ठीकसे देखो. बम्बई मेल फलाटफारमपर तैयार है.'

'मी माझे टिकीटाची तारीख पाहिली. रेल्वे टाईमटेबल दोनदा चाळला. गाडी ७ वा. ३० मिनिटांनी सुटणार होती. आमचे रिझर्वेशन त्याच दिवशीचे होते. मीच त्या कुलीला सामान नेण्याकरता बोलवले होते. मात्र गाडीची वेळ मी रात्री १० ची धरून चाललो होतो.

'जल्दी करो बाबू. तुम्हारा सब रुपयेका नुकसान होगा. हमको दोपहरको निंद नही आई.'

त्या कुलीच्या डोळ्यात पाणी आले. मी त्याचा कुणी नव्हतो. तो माझा कुणी नव्हता. मी मराठी माणूस, तो बंगाली कुली. माणूसकीच्या एका नात्यानं त्याला भारलं होतं. झपाझप पावलं टाकत त्यानं स्टेशन गाठलं. गार्डला विचारून माझ्या नंबरवर मला बसवून दिलं.

खूष होऊन मी त्याला पाच रुपये दिले. 'ये क्या बाबुजी–इतने पैसे?' तो मला म्हणाला. 'ये हमारी खुशी' मी म्हणालो. आपका टिकटका नुकसान नही हुवा इसमेंही हमको खुषी थी. बाबुजी–पैसेकी क्या जरूरत. पैसेसे खुशी नही मिलती साब!'

गाडीनं हळूहळू प्लॅटफॉर्म सोडला. त्या कुलीनं आपल्या डोक्याचं फडकं सोडलं अन त्यानं आपल्या डोळ्यांतील समाधानाचे अश्रू तो पुसत राहिला. मी त्या माणुसकीनं भारलेल्या अज्ञात इसमाकडे तो दिसेनासा होईपर्यंत पहात राहिलो.—खूप खूप वेळ.

काही लोकांना प्रवासाची जात्याच आवड असते. मी पण त्यापैकी एक आहे दहा–पंधरा दिवसांची सलग सुटी मिळाली की कुठे ना कुठे तरी प्रवासाला गेलेच पाहिजे असा जणू दरवर्षीचा कार्यक्रम ठरूनच गेलेला आहे दिवाळीनंतर तशी सलग सुटी असते, अन मग कुठल्या भागात जायचे याचे चक्र सुरू होते. त्या भागाची (भौगोलिक परिस्थितीची) चर्चा होते. गाड्या टाइमटेबल पाच–दहा वेळा चाळले जाते. अन एक दिवस रिझर्वेशन करून प्रवासाला सुरुवात होते.

जगन्नाथ पुरी-कोणार्क हा प्रवासही असाच सुरू झाला. प्रवास करताना धार्मिक स्थळे, यात्रा व प्रेक्षणीय स्थळे या दोहोंचाही विचार केलेला असतो. अर्थात' हिंदुधर्माप्रमाणे देवळे व मंदिराची रचनाच अशा रीतीने केलेली असते की माणूस जास्तीत जास्त प्रेक्षणीय अशा निसर्गसानिध्यात जातो. पशुपतीनाथाचे दर्शन घेताना किंवा हरिद्वार हृषिकेश करताना हिमालयाच्या रांगा, गंगेचे पवित्र पात्र व काही ठिकाणी घनदाट जंगले ही पार करावीच लागतात. अन मग त्यावेळीं मनुष्य निसर्गाची उदात्तता अनुभवीत असतो.


प्रवासात नाना रंगाचे, ढंगाचे व बहू भाषिक लोक भेटत असतात. मला भेटलेला हैदराबादचा अब्दुला, जगन्नाथपुरीचा जगन्नाथ किंवा कलकत्त्याचा बंगाली कुली, हे माणसांचे लोकविलक्षण नमुने होते. त्यांच्यामध्ये माणुसकीचा एक धागा होता. पुणे प्लॅटफॉर्मवर व कलकत्त्याच्या गाडीत नीती–अनीतीचे बंधन न मानणारी माणसे भेटली,–उच्चवर्गीय तसेच गरीब परिस्थितीतली. सगळीकडे मात्र माणूस म्हणून एक धागा सापडला. प्रेम, द्वेष, सद्भावना, वात्सल्य यासारख्या मनुष्यमनातील भावना जात पात, धर्म, पंथ या सगळ्यांना न जुमानणाऱ्या दिसल्या. सर्वच प्रसंग विलक्षण जिवंत वाटले.

परमेश्वर मला प्रसन्न झाला तर मी त्याला एकच मागणे मागीन––

'परमेश्वरा, मला वारंवार तुझ्या पायाचे दर्शन घडू दे. अन मग त्या करता प्रवास...प्रवास...आणि प्रवास...'

० ० ०

हिमालयाच्या कुशीत नेपाळमध्ये
पशुपतीनाथाचे मंदीराचा मागील भाग



# हिमालयाच्या कुशीत

दिवाळीची गडबड ओसरली. त्यानंतर सुमारे आठदहा दिवस सुट्टी असल्यामुळे दिवस कसे काढायचे हा प्रश्न ' आ वासून समोर उभा राहिला. आम्हाला सुट्टी असली तरी मुलाची शाळा सुरू होणार असल्यामूळे त्याला कुठ गावाला जायचे तरी कसे घेऊन जाणार हा उपप्रश्न निर्माण होणार होता. त्यातून मार्ग काढायला हवा होता, कारण ' पशुपतींनाथ दर्शन ' ( नेपाळ ) करायची इच्छा मनातून अत्यंत तीव्रतेने उत्पन्न झाली होती. ' हंस'चे संपादक श्री. आनंद अंतरकर हे गेल्या वर्षी तेथे जाऊन आले होते. त्यांचेकडून बरीचशी माहिती मिळाली व त्या माहितीच्या आधारे पुढील बेत आखायला सुरुवात केली. मुलाचा मामा आमचे घरी आठदहा दिवस येऊन राहिल्यास त्याची शाळा सुरळीत चालू राहील व आम्ही निश्चितपणे काठमांडूची सफर करू शकू असा एक बूट सो. कडून निघाला व त्याचप्रमाणे मामाला विनंती करण्यात आली. मामाचा होकार येताच रिझर्वेशन कसे करायचे त्याची चौकशी सुरु केली. पुण्याहून काठमांडूला जायचे म्हणजे बिहारची राजधानी पाटणा येथे जाऊन तेथून विमानाने काठमांडूला जायचे हा सोपा मार्ग आहे. पाटण्याहून–सडकमार्ग–जलमार्ग व रेल्वेमार्गाने रॉक्सॉलपर्यंत जाऊन काठमांडूला जाता येते. पण तो रस्ता अत्यंत त्रासाचा असल्यामुळे आम्ही पाटण्याचे (हावराजनता एक्स्प्रेचे ) रिझवेशन केले. १५ नोव्हेंबरचे रिझर्वेशन मिळाले. जनता एक्स्प्रेस मुंबईहून संध्याकाळी ७.३५ ला सुटणार होती. आम्ही सकाळी सहा पंचवीसच्या जनता एक्स्प्रेसने मुम्बईला जाण्याकरता गाडीत बसलो ते काहीशा अस्वस्थ मन:स्थितीतच !

गाडीत बसण्यापूर्वी पाटण्याहून काठमांडूचे विमानाचे विनंती तिकिट घेण्याकरता पुणे येथे इंडियन एअरलाईन्सच्या कचेरीत तीनचार वेळा जाऊन

आलो. पाटणा ते काठमांडू व पाटणा असे ( रिटर्न ) तिकिट घेऊन ठेवावे असे तेथे सुचवण्यात आले व त्याप्रमाणे माणशी सुमारे ११६ रु. भाडे भरून दोन तिकिटांचे येण्याजाण्याचे रु. ४६४ रु. कॅश भरले. माझ्यासारख्या सामान्य माणसाला विमान प्रवास करण्याकरता एवढी मोठी रक्कम भरताना जिवावर येत होते तर दुसरीकडे एक वेगळाच प्रदेश पहायला मिळणार या भावनेने आनंदही होत होता. आमची सौ. मात्र या बाबतीत अतिशय स्थित प्रज्ञ होती, कारण तिला आयुष्यात प्रथमच विमानप्रवास घडणार होता.

निघण्यापूर्वी इंडियन एअर लाइन्सच्या ऑफिसात दोन तीन वेळा फोन करूनही पाटणा ते काठमांडूच्या विमानाच्या तिकीटाचे कन्फर्मेशन न आल्यामुळे मी अतिशय बेचैन होतो. कारण त्या कन्फर्मेशन करता आम्हास पाटण्याला निष्कारणच अडकून पडावे लागले असते व खर्चही वाढला असता.

सकाळचा गार वारा अंगाला झोंबत होता. दिवाळीची सुटी संपलेली असल्यामुळे जनता एक्स्प्रेसला विशेष गर्दी नव्हती. आम्ही समोर आलेल्या डब्यातच स्थानापन्न झालो. मधूनमधून चहा चिवडा व चकल्या अनारसे असा फराळ चालू असल्यामूळे दिवाळीची आठवण ताजी रहात होती. मुंबईला जाणारी दोनतीन टारगट पोरं आमच्या समोर बाकावर बसलेल्या दक्षिण भारतीय तरूणीवर उगाचच इम्प्रेशन मारण्याचा प्रयत्न करीत होती.

गाडीने खंडाळा सोडले. एक चहावाला सुमारे पंधरावीस चहाचे कप व बशा घेऊन गडबडीने आमच्या समोरून जाऊ लागला. टारगट पोरांपैकी एकाचा पाय त्याच्या पायात अडकला अन तो एकाएकी खाली आपटला. त्याच्या कपातील गरमगरम चहा व टोस्ट त्या दक्षिण भारतीय तरुणीच्या अंगावर सांडले. त्यापैकी काही चहा माझ्या अंगावर व सौ. च्या गरम कपड्यावर, साडीवरही सांडला. फारशी काही दुखापत कुणालाच झाली नाही पण अंगावरचे कपडे मात्र खराब झाले. प्रवासात हे असं चालायचंच असा 'पोक्त' विचार आम्ही सर्वांनीच केला. कारण भांडायचं तरी कुणाशी ?' प्रवासात सहनशीलता येते त्याचा जिवंत प्रत्यय आम्हाला यावेळी आला. कारण सौ. चे अखंड चालणारे तोंड यावेळी गप्प होते. पुढील प्रवासात येणाऱ्या जीवघेण्या प्रसंगाची चहाचा अपघात एक नांदी तर नव्हती ?

मुंबईपर्यंत नंतर काही विशेषसे घडले नाही. गाडीचा वेग व टारगट पोरांचा झालेल्या प्रसंगावर आचरट विनोद, एकसारखा चालू राहिला.

जनता एक्स्प्रेस साडेदहा-अकराच्या सुमारास मुंबई व्ही. टी. वर पोचली. हमालीत फार पैसे खर्च होऊ नये म्हणून आम्ही सामान आटोपशीर-म्हणजे दोन सूटकेसीस व दोन हँडबॅग ठेवलेल्या होत्या. ( प्रत्यक्षात आमचा हमालीचा खूप खर्च झाला, पण त्याला इलाज नव्हता-कारण तो माझ्या वेंधळेपणाचा एक भाग आहे असे सौ. म्हणते. )

व्ही. टी. स्टेशनवर अगोदर जेवण करायचे असा एक ठराव आमच्या उभयतांनी पास केला व रेल्वेच्या 'अन्नपूर्णा' या उपहारगृहात आम्ही सकाळचे भोजन केले. सेल्फ सर्व्हिस हा तिथला एक भाग आहे. अर्थात ताटे आणण्याचे काम घरच्याप्रमाणेच सौ. नी केले त्यामुळे मला तो कार्यक्रम नेहमीचाच वाटला. अन्नपूर्णामध्ये आमच्या शेजारी बऱ्याचशा विदेशी तरुणी 'शाकाहारी' जेवण घेत असताना व काटे-चमचे सोडून हाताने जेवण करताना पाहिल्या तेव्हा मला विलक्षण अचंबा वाटला. आमच्याकडे काटे-चमच्यांनी मासाहारी जेवण घेण्याची पद्धत रुढ असताना विदेशी लोक शाकाहार व हाताने जेवण घेण्याकडे आकृष्ट होत आहेत, यातील विसंगती लक्षात घेण्यासारखी आहे. त्या विदेशी मुली बहुधा भारत-दर्शनाकरिता आल्या असाव्यात कारण---त्यांनी आपापले सामान ( सुमारे वीस किलो प्रत्येकी) आपल्या पाठीवरून वाहण्याची पद्धतशीर योजना आखलेली दिसली. धनटंचाईमुळे त्या मांसाहारा ऐवजी शाकाहाराकडे वळल्या किंवा कसे हे कळायला मात्र मार्ग नव्हता. जेवण तर झाले. आता कुठेतरी विश्रांती घ्यायला हवी ही सौ. ची सूचना मला एकदम पसंत पडली. रात्री गाडीत जागरण होणार होते. दुपारी विश्रांती आवश्यक होती. आमचे आतेभाऊ श्री. वा. दा. थत्ते, प्रकाशक, मुंबई सकाळ, यांचेकडे जाण्याशिवाय गत्यंतर नाही या विचाराने टॅक्सीत बसलो तेव्हा दुपारचे साडेबारा वाजले होते.

श्री. वा. दा. थत्ते यांनी आम्हा उभयतांचे उतम स्वागत केले. आम्ही जेवण करून आलो आहोत हे ऐकून त्यांना बरे वाटले नाही. मग त्यांच्या आग्रहाखातर आम्ही थोडा अल्पोपहार केला. काठमांडूच्या प्रवासाविषयी बरीच चर्चाही झाली. वा. दा. चा निरोप घेऊन आम्ही सहा वाजायच्या

सुमारास व्ही. टी. वर यऊन पोचलो. सामान क्लोकरूममध्यें ठेवले होते ते ताब्यात घेतले व आमच्या रिझर्वेशन डब्याची प्रतीक्षा करीत प्लॅटफॉर्मवर उभे राहिलो. थरीटायर डब्याला लावलेल्या यादीत मला माझे नाव काही लौकर सापडेना. म्हणून उभयता पुन्हा रिझवेशन क्लार्ककडे गेलो कौंटरवर चौकशी करण्याकरता म्हणून थांबलो, जवळच आमचे सामान पण होते. हावरा जनता-एक्सप्रेस प्लॅटफॉर्मवर लागली होती.

व्ही. टी. स्टेशनवर काही तरी अनौसमेंट झाली अन् सबर्वन गाडयांच्या शेडमधून माणसांचा एक प्रचंड लोंढा जोराने धावत थ्रु ट्रेन्सच्या शेडमध्ये येऊन दाखल झाला. काय झाले ते कळण्यापूर्वी आणखी एक मोठा लोंढा धावत धावत येऊ लागला. मी. सौ. ला सामान घेऊन बाजूला केले. पण माझ्याखालचीं माझी महत्त्वाची कागदपत्र असलेली सूटकेस निसटली. माणसांचे पाय लागून ती जोराने पुढे ढकलली गेली. साहजिकच मी ती धरायला म्हणून खाली वाकलो अन् कसेबसे तिचे हॅंडल धरले. आणि मग सुमारे साठ सेकंद जे घडले ते अवर्णनीय आहे. सगळया बाजूनी मी बुकलला जात होतो. बुटांचे पाय. चपलांचे पाय, अनवांणी पाय, गोरे पाय, काळे पाय, रांगडे पाय, दणकट पाय अन् मधूनच काही कोल्हापुरी चपलांचे, पुणेरी वहाणांचे तर मुबईच्या खास करोना शाहू कंपनीचे, पाय मला तुडवत होते. मी धरतीला खिळलो होतो. लोंढयाबरोबर मुंगीच्या पायाने पुढे पुढे जात होतो. ते साठ सेकंद मला कित्येक युगासारखे भासले माझे सर्वांग ठणकत होते कित्येक ठिकाणीं चांगलेच खरचटले होते. हजारो माणसे आली अन गेली- माझ्या सर्वांगाला तुडवून गेली. माझी कुणालाच पर्वा नव्हती. माझ्या सामानाची कुणाला पर्वा नव्हती. सौ. मला वाचवण्याकरता धडपड करत राहिली पण तिचा इलाज चालला नाही. कारण तीही माझ्याबरोबर त्या माणसांच्या लोंढयात अडकली असतो. ती नुसती डोळयात प्राण आणुन माझ्याकडें पहात राहिली--ओरडत राहिली. तिचा आवाज त्या प्रचंड कल्लोळात कुठे विरून जात होता तिलाहीं कळत नव्हते. माझा तर आवाजच बंद होण्याची वेळ आली होती. लोंढा ओसरला अन् मी उठून उभा राहिलो. कपडे ठीकठाक केले.

'हा लोंढा येण्याचे कारण काय हो!' मी हळूच एका टी. सी. ला विचारले

'कसारा लोकल त्यांनी इकडच्या प्लॅटफॉर्मवरून सोडली म्हणून हा गोंधळ झाला.' टी. सी. ने मला अगदी निर्विकारपणे उत्तर दिले. तो पुढे म्हणाला,—

'प्रत्येकाला आपापल्या घरी लौकर जायची घाई असते अन् म्हणून लौकर लोकल मिळावी अशी प्रत्येकाची इच्छा असते.'

इतरांचे काही असो मला मात्र बुकलून काढण्याची परमेश्वराची इच्छा होती. मी वाचलो याबद्दल पशुपतीनाथांचे वारंवार आभार मानून आम्ही हावरा जनता एक्स्प्रेसच्या प्लॅटफॉर्मवर, आपल्या सामानासकट येऊन दाखल झालो. पुन्हा एकदा (शेवटचा) प्रयत्न करून आपले नाव रिझर्वेशन यादीत आहे किंवा नाही याची खात्री करावी म्हणून दूरवर डब्यापर्यंत जाऊन आलो अन सुदैवाने एका थ्री टीयर शयनयान–डब्यावर लावलेल्या लांबलचक यादीमध्ये नं. १० व ११ वर माझे व सौ. चे नाव पाहून मनाला जो काही आनंद झाला, तो शब्दातीत आहे. रेल्वेखात्याच्या हलगर्जीपणामुळे (रिझर्वेशन यादी टाइप करताना कार्बन पेपर वाद झालेला वापरणे, व आयत्या वेळी भलत्या प्लॅटफॉर्मवरून भलत्या गाड्या सोडणे) माझा बळी पडायचा तो वाचला हे केवढे सुदैव !

मुंबई व्ही. टी.वर जीव बचावून आम्ही हावरा जनता एक्स्प्रेस व्हाया अलाहाबादमध्ये बसलो अन् गाडीने प्लॅटफॉर्म सोडला. आजूबाजूच्या सीटवर कोण कोण लोक आहेत त्यांचा अंदाज घ्यायला सुरवात केली. गाडीमध्ये बहुतेक सारे यूपीसाइडरच होते. त्यांची ती विशिष्ट हिंदी–कम भय्याटाईप बोली कानाला विचित्र वाटत होती. स्त्रियांचा एक जथ्था Ladies Room मध्ये बसलेला होता. सौ.ने प्रथम त्यांच्याशी ओळख करून घेतली. पाटण्याला त्यापैकी कुणी जाणारे आहे काय याचीही चौकशी केली. आमच्या समोरच्या बाकावर एक बंगाली कुटुंब (२ काळ्या ठेंगण्या लठ्ठ स्त्रिया व त्यांचे नवरे व दोन मुलं) स्थानापन्न झालेलं होतं. गाडीत चढताच त्यापैकी एकीचं आपल्या नवऱ्याशी जोराचं भांडण जुपलं. बाई बरीच जहांबाज होती. मुलाच्या सीटच्या रिझर्वेशनबद्दल काहीतरी घोटाळा झालेला होता हे त्यांच्या संभाषणावरून आम्ही ताडलं.

पुण्याहून निघण्यापूर्वी मीं माझ्या दोन्ही भावांना एकाला खांडव्याला व दुसऱ्याला इटार्सी स्टेशनवर भेटायला बोलावलं होतं. दोघांनीही पत्र नीट वाचलं नव्हतं. ते आदल्या दिवशी जनता एक्स्प्रेसवर येऊन गेले. मी आलो नाही याबद्दल त्यांन मला मनातल्या मनात शिव्यांची लाखोली वाहिली असल्यास नवल नव्हते. दोघांनीहि घरी जाऊन पुन्हा पत्रे वाचली. माझ्या पत्रात स्पष्ट उल्लेख होता : ता. १५ ला मुंबई व्ही. टीं.हून हावरा जनता एक्स्प्रेस व्हाया अलाहाबादने निघत आहोत. स्टेशनवर यावे. अर्थात दोघेही १६ तारखेला स्टेशनवर येण्याचेऐवजी ता. १५ लाच स्टेशनवर आले व मी आलो नाही म्हणून शिव्या देऊन परत गेले. त्यात अर्थात माझा काहीच दोष नव्हता. खांडव्याला चहा घ्यायचा असा मी व सौ.नें मनोमन बेत केला होता. पण भाऊ व वहिनीच्या गप्पागोष्टीत कित्येक वेळा चहावाला समोरून जाऊनही चहा प्यायला मिळाला नाही. वेळ संपली व गाडी चालू झाली. चहा प्यायचा तसाच राहून गेला याबद्दल हार्दा जंक्शन येईपर्यंत माझी व सौ. ची चांगलीच जुंपली. प्रवासात वेळ घालवायला नवरा–बायकोला भांडणासारखे दुसरे साधन नाही ह्याचा शोध मला त्या वेळीच लागला.

साडेदहा–अकराच्या सुमाराला आम्ही इटार्सी जंक्शनवर पोचलो. गाडी बराच वेळ थांबणार असल्यामुळे जेवणाचा कार्यक्रम उत्तम होणार होता. आमचे होशंगाबादचे बंधू मुद्दाम इटार्सीला भेटायला गाडीवर आल्यामुळे वेळ केव्हा निघून गेला त्याचा पत्ताही लागला नाही. इटार्सीपर्यंतचा एकूण परिसर माझ्या परिचयाचा असल्यामुळे त्यात नावीन्य असे काही नव्हते. इटार्सीनंतर मात्र एक वेगळाच प्रदेश सुरू होणार होता. गाडी जबलपूर अलाहाबादच्या रोखानें निघाली होती.

रात्री केव्हातरी (मी झोपलो असताना) अलाहाबाद, मोगलसराई येऊन गेली. मला त्याचा पत्ताही नव्हता. सकाळी उठलो तेव्हा मात्र गाडी पाटण्याच्या रोखाने कूच करीत होती. दुतर्फा हिरवीगार शेते व शेतांच्या कडांनी पाण्याचें बंधारे असून त्या बंधाऱ्यातून कमळांची फुले डुलत होती. हजारो–शेकडो कमळांची फुले पाहून माझ्या डोळ्याचे मात्र पारणे फिटले. मैलो न् मैल कमळांची फुले फुललेली पाहून माझ्या रसिक मनाला झालेला

आनंद शब्दात व्यक्त करणे शक्य नाही. एका राजाला शिक्षा होऊन त्याने काशी विश्वेश्वराला रोज एक हजार कमळांची फुले वाहिली पाहिजेत अशी आज्ञा झाली तेव्हा त्याने या भागातील फुलेच वेचली असली पाहिजेत याचे प्रत्यंतर मला आले. कारण आम्ही गंगेच्या काठीच होतो.

सकाळी नऊच्या सुमारास आम्ही पाटण्याला पोचलो. बिहारची राजधानी असल्यामुळे पाटणा मोठे शहर असावे असे मला वाटले पण माझी आशा फोल ठरली. केवळ राजधानी असल्यामुळेच एखाद्या गावाचा तोंडावळा बदलला जावा तसे ते शहर आहे. गावातील एकूण (नवीन इमारती सोडल्यास) बकालपणा नागपूर, जबलपूर यासारखाच आहे. सायकलरिक्शा ओढणारी माणसेच आहेत. एकूण सर्वसामान्य माणसाची परिस्थिती बिकटच आहे. नाही म्हणायला बिहारची हिंदी मात्र विशेष प्रकारची वाटली. यु. पी. मधील हिंदी किंवा उर्दू म्हणा हवे तर अन् बिहारी माणसाची हिंदी यातील अदब वेगवेगळी आहे. बिहार हा बंगालला त्यातल्या-त्यात जवळ असल्यामुळे बंगाली लोकही येथे प्रामुख्याने दिसतात. बिहारी मुसलमान मात्र हिंदूंमध्ये पूर्णतया मिसळलेले दिसतात. म्हणजे नाव कळले तरच हिंदु व मुलसमान ओळखू येऊ शकतो. अन्यथा वेशभूषा सारखीच असते.

पाटण्याला आम्ही एका अलिशान हॉटेलमध्ये उतरलो. स्नान, न्याहरी वगैरे करून प्रथम इंडियन एअर लाइन्सच्या सिटी ब्रँचची चौकशी केली. कारण दुसरे दिवशी सकाळचे प्लेन मिळाले तर आम्हास अतिशय सोईचे होते. आमचे रिझर्वेशन मात्र तिसरे दिवशीचे होते. आम्ही गांधी मैदाना-जवळ असलेल्या इंडियन एअर लाइन्सच्या ऑफिसमध्ये गेलो. आमच्या सीटचे कन्फर्मेशन पुण्याला पाठवले गेले असल्याचे आम्हाला सांगण्यात आले. दुसरे दिवशीची त्यांच्या प्लेनची फ्लाईट नसल्यामुळे तो दिवस आमच्या दृष्टीने फुकट जाणार होता. रॉयल नेपाळ एअरलाइन्सच्या विमानाची मात्र फ्लाईट आहे व आम्हास हवे असल्यास तिकिटे बदलून देण्याची व्यवस्था करण्यात येईल ! अर्थात या बेताला आम्ही लगेच रुकार दिला. दुसऱ्या दिवशीच्या फ्लाईटची तयारी केली.

पुणे ते मुंबई हा पंचवीस मिनिटांचा माझा विमानप्रवास अगोदरच झालेला असल्यामुळे माझी विमान प्रवासाची भीती बरीचशी कमी झालेली होती. सौ.ची मात्र विमानप्रवासाची पहिलीच वेळ असल्यामुळे तिला विमान 'लागेल' किंवा काय या भीतीने मी अर्धमेला झालो होतो.

इंडियन एअर लाइन्सच्या बसने आम्ही पाटण्याच्या एरोड्रोमवर पोचलो. विमान सकाळी ९.३० ला सुटायचे होते. कस्टम्समध्ये खूप कसून तपासणी केली जात होती. किती वेळा तरी नानाप्रकारचे फॉर्म भरून द्यावे लागायचे.

'काय मिस्टर तुम्ही कुठून आलात ?'

'पुण्याहून.'

'कुठे चाललात ?'

'काठमांडूला.'

'सामान एवढंच !'

'पशुपतीनाथाच्या दर्शनाला चाललोय. लगेचच परत फिरायचं आहे. तेव्हा जास्त सामानाची जरूरच काय आहे. !'

'काय काय आहे सामानात ?'

'कपडे अन् एक इंडियन कॅमरा !' मी पुढे म्हणालो, 'कॅमेराचं डिक्लेरेशन करायला हवं का ?'

'नको.'

'परत येताना तुम्ही मला त्रास देणार नाही ना या कॅमेराबद्दल–' मी खुलासा विचारला.

'You are very good people, dont worry.' कस्टमसवाल्यानी रिमार्क मारला. अन् आमच्या सामानासह आम्ही विमानात स्थानापन्न झालो.

पाटणा एरोड्रोमवर कस्टम्समध्ये सामानाचे चेकिंग होऊन आम्ही रॉयल नेपाळ एअर लाईन्सच्या विमानात चढलो. दारातच एक नेपाळी एअरहोस्टेस आमच्या स्वागताकरिता उभी होती. नेपाळी लोक कसे अस-

तील ? माझी उत्सुकता वाढू लागली होती. उंच शेलाटच्या बांध्याची, बसक्या नाकाची, काळयाभोर डोळयांची, भिवया चिनी-तिबेटी लोकांप्रमाणे कपाळावर असलेली, निळी गर्द साडी तिला रुपेरी किनार परिधान केलेली ती एअर होस्टेस ' नोमोस्ते ' करून गोड हसली तेव्हा स्वर्गाच्या दारात उभं राहून इंद्राच्या दरबारात बोलावणाऱ्या परीप्रमाणे ती मला भासली, यात मुळीच अतिशयोक्ती नाही. मी तिच्याकडे एकटक बघत राहिलो–साहजिकच माझ्या सौ.ला ते आवडले नाही. 'अहो, तिकडे काय बघत राहिलात, आपली सीट तिकडे आहे, म्हटलं.' असं म्हणत सौ. नं मला भानावर आणलं.

जगामध्ये ज्या अनंत गोष्टी–सुंदर फुले, फळे, चंद्र, तारे परमेश्वराने निर्माण केल्या त्यापैकीच सुन्दर स्त्रियाहि निर्माण केल्या आहेत, मग त्यांची रसिकतेने दखल घेतली तर त्याचा मत्सर बायकोला का वाटावा, याचे कोडे मला अजून उलगडलेले नाही. बहुधा स्त्रिया या सहिष्णू नसाव्यात, असेच मला वाटते.

विमानाने टेक ऑफ घेतला. सर्वांनी खुर्चीला असलेले पट्टे आपापल्या पोटाला आवळून घ्यावे, असे एअर–होस्टेसने नम्रपणे सुचवले. मला विमानप्रवासाची सवय होती. सौ.ला विमान वरवर जाऊ लागताच थोडे गरगरल्यासारखं होई. खिडकीतून आता पाटणा शहराचे रस्ते, इमारती, नदी व झाडे, टेकड्या खेळातील वस्तूंप्रमाणे दिसू लागल्या. सबंध पाटणा शहराला एक वळसा घालून विमान हळूहळू उंचउंच जाऊ लागले व आम्ही हिमालयाच्या रोखाने कूच करू लागलो. विमानाखालून ढग जाताना दिसू लागत तेव्हा त्यांना हळूच जाऊन पकडावे, त्यावर स्वार व्हावे, असा गमतीदार विचार मनात आला. सुमारे चार हजार फूट उंचीवर गेल्यावर विमान संथ झाले. पंधरावीस मिनिटांनी एअर होस्टेसने ब्रेकफास्ट म्हणून बिस्किटे, व्हिजिटेबल कटलेट व केक्स कागदी डब्यातून आमचे समोर ठेवले. ( आम्ही व्हिजिटेरियन म्हणून नाव नोंदवले होते. ) मागाहून कॉफीचे ग्लास देण्यात आले. विमान इतके संथ गतीने चालले होते की कॉफीचा ग्लास समोर असलेल्या छोट्या टेबलावर अगदी स्थिर हाता. मी सौ. ला ते दाखवले तेव्हा तीही बुचकळयात पडली. म्हणजे विमान अजिबात हलत नव्हते

तर खालची जमीनच मागे जात होती, असे वाटू लागले होते. एखादा पांढराशुभ्र ढग विमानाखालून जाताना दिसला की मात्र विमानाच्या वेगाची कल्पना येई.

सुमारे पाऊण तासाने विमान नेपाळच्या हद्दीत प्रवास करू लागले. सर्वत्र उंच उंच पर्वत व त्यांची बर्फाच्छदित शिखरे पाहून आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले. त्या शिखरावर सूर्याची किरणे पडलेली असल्यामुळे चंदेरी बरसात झाल्यासारखी ती चकाकत होती. सर्वत्र अशा चमचमणाऱ्या शिखरांचा नयनमनोहर देखावा पाहून निदान हा जन्म तरी धन्य झाला असे आम्हा दोघांनाही वाटले असल्यास नवल नव्हते. विमान खालींखाली येऊ लागले तेव्हा नेपाळातील लहानलहान टेकड्यांवर वसलेली गावे दिसू लागत.

' नोव्हेंबर महिन्यात तुम्ही नेपाळला जाऊ नका थंडी फार असते.' आम्ही नेपाळ प्रवासाला निघालो तेव्हा तेथे जाऊन आलेल्या काही लोकांनी आम्हाला सांगितले होते. त्यांचे म्हणणे खरे होते. आम्ही काठमांडूच्या एरोड्रोमवर उतरलो तेव्हा दुपारचे अकरा वाजले होते तरी थंडगार वारे अंगाला झोंबत होते. उन्ह अजिबात जाणवत नव्हते. चारही बाजूंना टेकड्या बर्फाच्छदित शिखरे असलेले पर्वत व मध्यभागी एरोड्रोम. विमान येत–जात. नाना देशांचे, पंथांचे, धर्मांचे लोक उतरत, चढत. त्यांचे निरनिराळे पोषाख हिप्पींचा भरणा तर फार मोठ्या प्रमाणात. हिप्पी मुले-मुली फाटक्या कपड्यांनिशी घाणेरड्या अवस्थेत वावरत होते. जगाची त्यांना पर्वा नव्हती. एकमेकांच्या हातात हात घालून गप्पागोष्टीत रंगलेली ती ' अवलिया ' मंडळी धुन्द होऊन, ' दम मारो दम ' करत चाललेली दिसायची. नेपाळमध्ये हिप्पी लोकांचा फार मोठा आश्रम आमच्या पहाण्यात आला.

एरोड्रोमवर पुन्हा कस्टम्सतर्फे तपासणी झाली. माझ्याकडे नॅशनॅलिटी सर्टि. नव्हते, म्हणून आम्हाला अडवण्यात आले. शेवटी स्कूटर लायसन्स दाखवून मी ती अडचण सोडवली व आम्हाला शहरात जाण्याकरता प्रवेश मिळाला. एकदोन प्रवाशांकडून माहिती मिळाल्यावरून (सौ. शाकाहारी असल्यामुळे ) आम्ही मारवाडी सेवा–समितीने काढलेल्या एका


निवासस्थानात खोली मिळवली जेवणखाणं आटोपून आम्ही टॅक्सी करून काठमांडूमधील मुख्यमुख्य गोष्टी पाहण्याकरता निघालो.

पशुपतीनाथाचं अतिप्राचीन देवालय हे नेपाळच खास आकर्षण आहे, व आमची ही ट्रीप त्याकरताच आम्ही आयोजित केली होती.


काठमांडू एरोड्रोमवरून टॅक्सी करून आम्ही मारवाडी धामामध्ये आपल्या खर्चात दाखल झालो. भारतातील पुष्कळ प्रकारचे लोक आम्हास तेथे दिसले. एका खोलीमध्ये दोन कॉटस होत्या. जेवणाचीही सोय होती. सकाळी दहा-साडेदहाची वेळ होती. थंडी मी म्हणत होती. थोडा वेळ विश्रांती घेऊन जेवण करून आम्ही पायीच इकडेतिकडे भटकायचे ठरवले. काठमांडू शहरामधून टॅक्सी जात होती. काठमांडूची घरे बैठी असून धाब्याची आहेत. स्त्रिया मुक्तपणे दारासमोर वेणीफणी करीत होत्या. फळफळावळ व भाजी–पाला विपुल दिसला.

जेवताना मात्र खूपच मजा आली. खूप लांबलांब वांगी, मोठमोठे फ्लावरचे गड्डे व अशाच प्रकारची भाजीपाल्याची विपुलता जेवणघरात होती. तांदूळ तर खूपच सुरेख होता. आम्ही मारवाडी धामातच असल्यामुळे आम्हास भारतीय पद्धतीचे जेवण मिळत असल्यामुळे आम्ही (विशेषत: सौ.) अधिक खूष होती. पिण्याचे पाणी अतिशय थंड आणि मधुर होते. खूप पोटभर जेवूनही भूक भागत नव्हती. थंड पाणी पिऊन मात्र खूप शांत वाटले. विमानातच आमची एका मारवाडी मुलीशी ओळख झाली होती. तिचे सासर काठमांडूला होते. ती एकटीच विमानप्रवास करीत असल्यामुळे सोबत म्हणून तिच्या भावाने पाटण्यालाच आम्हाला तिची देखभाल करण्याविषयी विनंती केली होती. मुलगी वीसबावीस वर्षांची अन् खूपच खेळकर होती. सौ. ने काठमांडूला गेल्यावर उतरण्याची सोय कोठे आहे म्हणून प्रश्न केला होता त्या वेळी तिनेच आम्हाला मारवाडी धामाचे नाव सुचवून कमीत कमी खर्चात भारतीय लोकांची राहण्याची सोय असलेले ते ठिकाण आम्हास सुचवले होते.

जेवणखाण झाल्यानंतर अंगात खूप हुडहुडी भरली. दुपारी एकची वेळ असूनही अंगातील थंडी कमी होत नव्हती. चारपाच वाजेपर्यंत विश्रांती



काठमांडुमधील बुद्धाचें एक मंदीर



काठमांडूमधील बाजाराचे एक दृष्य

घेऊन व चहापाणी करून आम्ही जवळपास पायीच भटकलो. बाजारपेठेतून एक चक्कर टाकली. परदेशी वस्तूंमध्ये कापडचोपड, कॅमेरे, नाना प्रकारची भांडी, घड्याळे नी अशाच प्रकारचे किमती सामान यांनी दुकाने गच्च भरली होती. चिनी बनावटीचे उत्तमोत्तम सामान येथे मुबलक मिळत होते. नेपाळ हे फ्री असल्यामुळे स्वस्त किंमतीत हे सामान मिळत होते.

पोवळे आणि एकमुखी रुद्राक्ष याकरिता आम्ही बरेच भटकलो परंतु ते आम्हाला मिळाले नाही. एकमुखी रुद्राक्ष मिळाला तर आणण्याकरता आमच्या बऱ्याच नातेवाईकांनी आम्हाला अजीजीने सांगितले होते. अस्सल पोवळे मात्र माझ्या सौ. लाच हवे होते.

एका दुकानात आम्ही पोवळ्याची माळ बघितली. तिची किंमत आम्हाला दुकानदाराने सहाशे रुपये सांगितली. आम्ही पोवळ्याची माळ विकत घेण्याचा बेत रहित केला. संध्याकाळी सहासात वाजेपर्यंत भटकून, जेवण करून आम्ही त्या रात्री थंडीचा कडाका सहन करीत झोपी गेलो. दुसरे दिवशी पक्षुपतीनाथाचे दर्शन करून व इतर प्रेक्षणीय स्थळे पाहून तिसरे दिवशीचे विमानाचे रिझर्वेशन अगोदरच केलेले असल्यामुळे निघायचे होते.

पंचवीस भारतीय रुपयात आम्ही एक टॅक्सी ठरवली. मुख्य मुख्य प्रेक्षणीय स्थळे त्यानेच आम्हाला दाखवायची असे ठरले. सर्वप्रथम आम्ही पक्षुपतीनाथाचे दर्शन घ्यायला निघालो.

पहाटे पाच वाजल्यापासून सौ.ची तयारी सुरू झाली. पुण्याच्या थंडीतही अंगात स्वेटर नी कानाला मफलर गुंडाळून बसणारी सौ. काठमांडूला इतक्या कडाक्याच्या थंडीत स्नानाला अन तीहि पहाटे पाचला निघालेली पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. मी मात्र अंथरुणात एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळत होतो.

सकाळी सात वाजेपर्यंत इतके धुके होते की खिडकीतून बाहेर पाहिले तेव्हा काहीही दिसत नव्हते. सूर्याचे एक किरण खिडकीतून आत आले अन मग मला उठावेसे वाटले. प्रातर्विधी आटोपून, चहाचा मग घशाखाली रिचवून मी दाढी करायला बसलो. मोठ्या मुष्कीलीने दोन तांबे पाणी डोक्यावरून घेतले. सौ. मात्र त्या वेळी कपडे वगैरे धुऊन वाळत टाकतांना दिसली. ‘ इतक्या थंडीत तू कपडे धुतलेस ? ’ मी तिला विचारले तेव्हा

मानेनंच तिनं होकार भरला. अन् मला लौकर तयार व्हायचा इशारा दिला.

ठरल्याप्रमाणे आम्ही टॅक्सीतून पशुपतीनाथाचे मंदिरात आलो. पुजारी भारतीय आहेत. आम्ही एक स्थानिक गाईड घेतला. त्याने आम्हाला त्याच्या मोडक्यातोडक्या भाषेत देवळाची व परिसराची त्याच्या मगदुराप्रमाणे माहिती दिली. श्रीशंकराने पार्वतीच्या वडिलांचा जेथे वध केला ते शिल्प खूप मोठे अन् प्रशस्त आहे. श्रीशंकराचे स्थान नेपाळ सारख्या शांत अन् पवित्र जागी जगाच्या गोंगाटापासून हिमालयात फार दूर वसलेले आहे, ते निसर्गाचे रमणीय रूप आपल्या भक्तांना दिसावे म्हणूनच.

पशुपती नाथाची मूर्ती खूप छान आहे. सत्याशी लाख योनींचा फेरा चुकवण्याकरता एका लुटुपुटुच्या दगडांच्या योनीमधून भक्तगणांनी जावे म्हणून ओऱ्या बांधलेल्या आहेत. जपानी पद्धतीचे (पॅगोडा टाईप) छप्पर असलेले पशुपतीनाथाचे मंदीर बागमती नदीच्या तीरावर बांधलेले भव्य देवालय आहे. या देवालयात हिप्पी लोकांना यायची मनाई असल्या-मुळे त्या लोकांनी बागमतीच्या दुसऱ्या तीरावर एक आश्रम उभारला असून ते प्रचंड संख्येने 'हरे राम हरे कृष्ण'चा जप पेटीच्या सुरावर सामुदायिक रीत्या तेथे म्हणत असलेले दिसले. गांजा, अफू, चरस या मादक पदार्थांचे सेवन करून ब्रह्मानंदात विलीन झालेली ती हिप्पी मंडळी पाहून मला खूप मौज वाटली.

पशुपतीनाथाचे दर्शन, अभिषेक व अन्य धार्मिक विधी करून आम्ही पुन्हा टॅक्सीत बसलो. आता आम्ही बुद्धाच्या एका प्रचंड घुमटाजवळ आलो होतो. जगातील प्रचंड बुद्ध स्तुपामध्ये नेपाळचा हा स्तूप गणला जातो. या स्तुपाचा परीघ मैल–दोन मैलांच्या आसपास आहे. ह्याच स्तुपाभोवती नेंपाळी लोकांनी ठेवलेल्या कित्येक हस्तकौशल्याच्या काशाच्या भांड्यांची, मूर्तिची दुकाने होती.

टॅक्सी आता एका उद्यानाकडे निघालेली होती. दुतर्फा घनदाट झाडी असलेल्या त्या रस्त्याने जाताना खूप बरे वाटले. समोर हिमालयाच्या

घेऊन व चहापाणी करून आम्ही जवळपास पायीच भटकलो. बाजारपेठेतून एक चक्कर टाकली. परदेशी वस्तूंमध्ये कापडचोपड, कॅमेरे, नाना प्रकारची भांडी, घड्याळे नी अशाच प्रकारचे किमती सामान यांनी दुकाने गच्च भरली होती. चिनी बनावटीचे उत्तमोत्तम सामान येथे मुबलक मिळत होते. नेपाळ हे फ्री असल्यामुळे स्वस्त किंमतीत हे सामान मिळत होते.

पोवळे आणि एकमुखी रुद्राक्ष याकरिता आम्ही बरेच भटकलो परंतु ते आम्हाला मिळाले नाही. एकमुखी रुद्राक्ष मिळाला तर आणण्याकरता आमच्या बऱ्याच नातेवाईकांनी आम्हाला अजीजीने सांगितले होते. अस्सल पोवळे मात्र माझ्या सौ. लाच हवे होते.

एका दुकानात आम्ही पोवळ्याची माळ बघितली. तिची किंमत आम्हाला दुकानदाराने सहाशे रुपये सांगितली. आम्ही पोवळ्याची माळ विकत घेण्याचा बेत रहित केला. संध्याकाळी सहासात वाजेपर्यंत भटकून, जेवण करून आम्ही त्या रात्री थंडीचा कडाका सहन करीत झोपी गेलो. दुसरे दिवशी पक्षुपत्तीनाथाचे दर्शन करून व इतर प्रेक्षणीय स्थळे पाहून तिसरे दिवशीचे विमानाचे रिझर्वेशन अगोदरच केलेले असल्यामुळे निघायचे होते.

पंचवीस भारतीय रुपयात आम्ही एक टॅक्सी ठरवली. मुख्य मुख्य प्रेक्षणीय स्थळे त्यानेच आम्हाला दाखवायची असे ठरले. सर्वप्रथम आम्ही पक्षुपतीनाथाचे दर्शन घ्यायला निघालो.

पहाटे पाच वाजल्यापासून सौ.ची तयारी सुरू झाली. पुण्याच्या थंडीतही अंगात स्वेटर नी कानाला मफलर गुंडाळून बसणारी सौ. काठमांडूला इतक्या कडाक्याच्या थंडीत स्नानाला अन तीहि पहाटे पाचला निघालेली पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. मी मात्र अंथरुणात एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळत होतो.

सकाळी सात वाजेपर्यंत इतके धुके होते की खिडकीतून बाहेर पाहिले तेव्हा काहीही दिसत नव्हते. सूर्याचे एक किरण खिडकीतून आत आले अन मग मला उठावेसे वाटले. प्रातर्विधी आटोपून, चहाचा मग घशाखाली रिचवून मी दाढी करायला बसलो. मोठ्या मुष्कीलीने दोन तांबे पाणी डोक्यावरून घेतले. सौ. मात्र त्या वेळी कपडे वगैरे धुऊन वाळत टाकतांना दिसली. ‘ इतक्या थंडीत तू कपडे धुतलेस ? ’ मी तिला विचारले तेव्हा

मानेनंच तिनं होकार भरला. अन् मला लौकर तयार व्हायचा इशारा दिला.

ठरल्याप्रमाणे आम्ही टॅक्सीतून पशुपतीनाथाचे मंदिरात आलो. पुजारी भारतीय आहेत. आम्ही एक स्थानिक गाईड घेतला. त्याने आम्हाला त्याच्या मोडक्यातोडक्या भाषेत देवळाची व परिसराची त्याच्या मगदुराप्रमाणे माहिती दिली. श्रीशंकराने पार्वतीच्या वडिलांचा जेथे वध केला ते शिल्प खूप मोठे अन् प्रशस्त आहे. श्रीशंकराचे स्थान नेपाळ सारख्या शांत अन् पवित्र जागी जगाच्या गोंगाटापासून हिमालयात फार दूर वसलेले आहे, ते निसर्गाचे रमणीय रूप आपल्या भक्तांना दिसावे म्हणूनच.

पशुपती नाथाची मूर्ती खूप छान आहे. सत्याशी लाख योनींचा फेरा चुकवण्याकरता एका लुटुपुटुच्या दगडांच्या योनीमधून भक्तगणांनी जावे म्हणून ओऱ्या बांधलेल्या आहेत. जपानी पद्धतीचे (पॅगोडा टाईप) छप्पर असलेले पशुपतीनाथाचे मंदीर बागमती नदीच्या तीरावर बांधलेले भव्य देवालय आहे. या देवालयात हिप्पी लोकांना यायची मनाई असल्या-मुळे त्या लोकांनी बागमतीच्या दुसऱ्या तीरावर एक आश्रम उभारला असून ते प्रचंड संख्येने 'हरे राम हरे कृष्ण'चा जप पेटीच्या सुरावर सामुदायिक रीत्या तेथे म्हणत असलेले दिसले. गांजा, अफू, चरस या मादक पदार्थांचे सेवन करून ब्रह्मानंदात विलीन झालेली ती हिप्पी मंडळी पाहून मला खूप मौज वाटली.

पशुपतीनाथाचे दर्शन, अभिषेक व अन्य धार्मिक विधी करून आम्ही पुन्हा टॅक्सीत बसलो. आता आम्ही बुद्धाच्या एका प्रचंड घुमटाजवळ आलो होतो. जगातील प्रचंड बुद्ध स्तुपामध्ये नेपाळचा हा स्तूप गणला जातो. या स्तुपाचा परीघ मैल-दोन मैलांच्या आसपास आहे. ह्याच स्तुपाभोवती नेंपाळी लोकांनी ठेवलेल्या कित्येक हस्तकौशल्याच्या काशाच्या भांड्यांची, मूर्तिची दुकाने होती.

टॅक्सी आता एका उद्यानाकडे निघालेली होती. दुतर्फा घनदाट झाडी असलेल्या त्या रस्त्याने जाताना खूप बरे वाटले. समोर हिमालयाच्या

उंचच उंच रांगा दिसत होत्या. लांबवर हिमालयाची हिमाच्छादित शिखरे अगदी स्पष्टपणे दिसत होती. ते पहा ते ‘ कांचनगंगा ’ मी सौ.ला म्हणालो.

‘ तुम्हाला काय ठाऊक ? ’ सौ. म्हणाली.

‘ अगदी हिमालयातील बर्फाच्छादित शिखर म्हणजे ‘ कांचनगंगा’च. भुगोलात शिकली नाहीस का तूं ?’

‘ बरं असेल ! ’ सौ. म्हणाली. टॅक्सी आता एका उद्यानाच्या फाटकापाशी येऊन पोचली होती. अनेक उद्यानांप्रमाणे हेही उद्यान होते. आम्ही थोडा वेळ इकडेतिकडे हिंडून पुन्हा टॅक्सीत बसलो. एका नेपाळी बाईने आम्हाला या उद्यानात पाणी पिण्याकरता स्वतःचे भांडे आपण होऊन दिले !’ यावरून नेपाळी लोक स्वभावाने चांगले अन् आतिथ्यशील असतात, हा माझा ग्रह अधिक दृढ झाला.

नेपाळी माणूस हा अंगापिडान कणखर, पाठीवर अनेक मणांचे ओझे वाहून नेणारा, उंच भुवया, बस्के नाक असलेला अन् ठेंगणा असतो. त्यांच्या दाढीमिशांची अन् केसांचो ठेवण विशिष्ट असते. केस विरळ असतात. स्त्रियाही पुरुषांप्रमाणेच दणकट अन् अंगापिडाने भरलेल्या असतात. त्यांच्या नाकात अन कानात मोठमोठ्या रिंगा असतात. अंगात एक चोळी अन् घागरा एवढाच त्यांचा पोशाख असतो. नेपाळमध्ये मुलाला ‘ कांचा ’ अन् मुलीला ‘ कांची ’ म्हणतात. ‘ कांचा’रे ‘ कांचा’रे हे एका हिंदी चित्रपटातील गीतही त्या दोन शब्दांभोवती गुंफलेले आहे.

भारत–नेपाळ मैत्रीचे प्रतीक नेपाळमध्ये जागजागी दिसून येते. मुख्य म्हणजे नेपाळ–नरेश हिंदु धर्माप्रमाणे वागतात. स्वतःला हिन्दु समजतात. बौद्ध धर्मही येथे पाळला जातो. नेपाळमध्ये आल्यावर भारतीय माणूस आणि नेपाळी माणूस यात संस्कृतीचा एक वारसा आहे, धागा आहे हे चटकन जाणवते. नेपाळ–नरेश आणि राणी रत्ना यांचे भारतामध्ये सुमारे एक आठवडा वास्तव्य होते व त्यांनी सर्व भारतभर भ्रमण करून या देशाशी नेपाळची मैत्री अधिक दृढ करून घेतली आहे. भारतही नेपाळची सर्वांगीण उन्नत्ती व्हावी म्हणून झटत आहे.

पशुपतीनाथाचे दर्शन घ्यायला भारतयात्री जात असतो. त्यायोगाने नेपाळसारख्या शेजारी राष्ट्राची त्याला ओळख होत असते. भारताच्या

सैनिकात नेपाळी गुरखा लढवय्या म्हणून प्रसिद्ध आहे. त्या गुरख्यांची मातृभूमी याची देही याची डोळा पहायला मिळणे हे मोठे भाग्य आहे. ते भाग्य मला मिळाले आहे.

संध्याकाळी आम्ही नेपाळ एअरलाईन्सच्या कार्यालयात जाऊन दुसऱ्या दिवशीच्या तिकिटाचे कन्फर्मेशन करून घेतले. सकाळी आठलाच विमान निघायचे होते. एका रेस्टोरांत चहा पिऊन, जवळच्या उद्यानात हिंडून व बाजारपेठेत एक चक्कर मारून आम्ही निवासस्थानी पोचलो तेव्हा रात्री आठ वाजून गेले होते अन् थंडीचा कडाका पडू लागला होता.

विमानाच्या कचेरीत 'मौंट एव्हरेस्ट'ला एक चक्कर मारून आणण्याच्या एव्हरेस्टफ्लाईट'ला रु. दोनशे तिकिट आहे, हे मला कळले. माझी मौंट एव्हरेस्ट पाहण्याची इच्छाही होती. पण त्या पैशाची निघतांना तरतूद नसल्यामुळे मला तो विचार सोडून द्यावा लागला. मौंट एव्हरेस्ट या जन्मी पुन्हा एकदा विमानाने पाहण्याची माझी इच्छा आहे. अन त्याकरता मला पुन्हा एकदा काठमांडूला जावे लागेल असे वाटते. एक दुसरी इच्छा मनात ठाण मांडून आहे. नेपाळ एअरलाईन्सच्या ज्या विमानाने पाटणा ते काठमांडू आम्ही असा प्रवास केला त्या विमानातील एअरहोस्टेस...ती निळया साडीतील, गोरी गोरी, बसक्या नाकाची रूपसुदंर नेपाळी मुलगी पुन्हा केव्हातरी पहायला मिळावी. ही दुसरी इच्छा मात्र मी सौ. ला सांगितलेली नाही.

दुसरे दिवशी सकाळी एअर लाईन्सच्या बसमधूनच आम्ही एरोड्रोम-कडे निघालो. थंडी मी म्हणत होती. धुक्यामुळे सारा आसमंत भरून गेला होता. सकाळी ८ वाजून ३० मिनिटांनी विमान सुटायचे होते. त्याअगोदर ७ वाजता एक विमान निघणार होते. आम्ही एरोड्रोमवर पोचलो. सामानाची सर्व प्रकारची तपासणी झाली, विमानाला बराच उशीर असल्यामुळे आम्ही एरोड्रोमच्या एका प्रचंड हॉलमध्ये आमच्या फ्लाइट क्र. ४८७ च्या अनौंसमेंटची वाट पहात खुर्च्यांवर स्थानापन्न झालो.

विमानप्रवास करणारी सारीच माणसे उच्च्य कोटीतील असतात असा माझा एक भ्रम होता तो दूर झाला. या प्रवासात मला सर्व प्रकारची माणसं दिसली.

त्यामधे विदेशी लोकांचा भरणा अधिक होता, हे मात्र खरे. भारतीय लोक पोषाखाच्या बाबतीत अधिक काटेकोर आहेत. त्यांचे कपडे भारी व इस्त्री टाईट असतात. त्यांचे म्यॅनर्स विदेशी असतात. बोलणे इंग्रजी असते. ही सारी माणसे एका विशिष्ट गंडानं पछाडलेली असतात. आपण विमान-प्रवास करीत आहोत म्हणजे स्वर्गप्रवासच करीत आहोत असा काहींसा भाव त्यांच्या चेहऱ्यावर असतो. याउलट विदेशी प्रवाशांचे असते. त्यांचे कपडे फारसे चांगले नसतात, किंबहुना जीनची पँट, जाडभरडे अंगरखे, पायांत चपला, नाहीतर सपाता. केसांना तेल नसतेच. काहीतर फक्त अंडरपँट व बनियनवरच हिंडत असतात. मनमोकळे असतात. एकूण विदेशी लोक कपड्यांच्या व इतर चालिरीतींच्या बाबतीत अधिक उदासीन दिसले. एक हिप्पी माणूस तर चक्क चार मिनारचे झुरके घेत असलेला मी पाहिला तेव्हा मी चाट पडलो. विमानप्रवासाची माझी भीती आता कमी झाली होती. सर्व प्रकारच्या लोकांमध्ये मिसळण्याची एक वेगळीच संधी मला मिळाली होती. विमानासंबंधीची अनौंसमेंट सारखी होत होती. पहिले साडेसातला सुटणारे विमान टेक ऑफ घेऊ शकत नव्हते. त्याचे मशीनरीत काहीतरी दोष निर्माण झाला असावा. विमान सुरू होई. पंख्यांचा मोठा आवाज होई अन ते धाव-पट्टीवर धावू लागेल. परंतु हवेत उडायची वेळ आली की ते पुन्हा खाली येई. बरेच वेळा ट्रायल होऊन मग त्या विमानातील तांत्रिक दोष दूर करण्यात आला व ते निघाले. काठमांडू ते कलकत्ता असा त्याचा प्रवास होता. धुक्या-मुळे तेही विमान बरेच उशीरा सुटले.

दहा वाजून गेले तरी आमच्या विमानाचा पत्ता नव्हता. अजूनही अवकाशातील धुके वितळले नव्हते. सूर्यप्रकाश आता बराचसा तीव्र झाला होता. एरोड्रोमभोवती लांबवर असलेल्या हिमालयाच्या रांगा व त्यांच्या शिखरावरील बर्फ चमकू लागला होता. मला ते दृश्य फार विलोभनीय वाटले. एखाद्या कलशातून पांढऱ्याशुभ्र दुधाची धार ओतली जावी, तसे काहीसे वाटले.

साडेदहाच्या सुमारास फ्लाईट क्रमांक ४८७ ची अनौंसमेंट झाली अन आम्ही सर्व प्रवासी त्या विमानाकडे जाऊ लागलो. आमच्या बॅगा त्या-

पूर्वीच विमानावर चढवल्या गेल्या होत्या. आम्ही विमानात बसलो. पाच-दहा मिनिटातच विमान सुटले. एअरहोस्टेसने सर्वांना अभिवादन करून खुर्चीचे पट्टे कमरेला आवळायला सांगितले. विमान धावपट्टीवर धावू लागले अन् त्याने टेक ऑफ घेतला. त्या वेळी थोडे डोके गरगरले. मग ते एका सरळ रेषेत धावू लागले, मी खिडकीतून खाली पाहिले. खूप धुके होते. विमान चालू आहे किंवा स्थिर आहे काहीही जाणवत नव्हते. विमानातच एअरहोस्टेसने कॉफीचे ग्लास व ब्रेकफास्टची पाकिटं आणून दिली.

विमानच्या गतीकडे माझे सारखे लक्ष होते. विमानाने एरोड्रोम सोडून अर्धा तास झाला होता. खरे म्हणजे आतापर्यंत अर्धा रस्ता कापून व्हायला हवा होता. मला काहीतरी संशय आला. धुक्यामुळे पायलटला काही दिसत नसावे की काय ? विमान बराच वेळ काहीसे स्थिर असल्यासारखे वाटत होते. माझ्या छातीत धस्स झाले. धुक्यात दिशा न दिसल्यामुळे अनेक वेळा विमानांना अपघात होतात अशा बातम्या बरेच वेळा वर्तमानपत्रात वाचल्याचे मला आठवले. आम्ही उडत होतो तिथेही हिमालयाच्या लहानलहान रांगा होत्याच. तेव्हा विमानाचा अपघात झाला तर आमच्यापैकी कुणीही जिवंत राहण्याची शक्यता नव्हती. मी मनातल्या मनात परमेश्वराचे स्तुती स्तोत्र म्हणू लागलो. सौ. मात्र सावकाशपणे कॉफीचे घोट घेत असतांना मला दिसली. मी माझ्या मनातील शंका तिला सांगितली नाही. साडेअकरा वाजले तरी अजून पाटण्याचा परिसर दिसत नव्हता. विमान बराच वेळ धुक्यामध्ये गरगर फिरत असावे हा माझा अंदाज काहीसा बरोबर होता. सुमारे बाराच्या सुमारास पाटण्याचा परिसर दिसायला लागला. गंडकी नदी वहात असताना दिसली. मोठमोठ्या इमारती दिसल्या अन माझ्या जिवात जीव आला.

विमान सुखरूपपणे पाटणा एरोड्रोमवर उतरले तेव्हा साडेबारा वाजून गेले होते. आमच्या बॅगा विमानातून डायरेक्ट कस्टमस ऑफिसमध्ये पोचल्या. बॅगांची भराभर तपासणी होऊ लागली. आम्ही आमच्या बॅगेचा केव्हा नंबर लागतो याची वाट पहात होतो व इतरांच्या बॅगेतून काय काय ऑब्जे-

वशनबेल निघते ती गंमत पहात होतो. एका गलेलठ्ठ बाईच्या बॅगची तपासणी सुरू झाली. तिने तीनचार चायना सिल्कच्या साड्या आणल्या होत्या. पर्सनल वापराकरिता एखादी साडी आणण्याची परवानगी होती. तसेच तिने नाना प्रकारची कलाकुसरीची चायना मेकची भांडीही आणली होती. हे एवढे कशाकरिता ? म्हणून कस्टम्स अधिकाऱ्याने प्रश्न विचारला. बाई बरीच गांगरली होती. माझ्या घरगुती वापराकरताच मी हे सारे आणले आहे असा कबुलीजबाब, ओळखीच्या माणसाचा जामीन वगैरे झाल्यानंतर त्या बाईची सुटका झाली. या सगळ्या चौकशीमुळे आम्हाला मात्र उगीचच खोळंबून रहावे लागत होते. शेवटी आमची बॅग आली. माझा आग्फा क्लीक नं. ३ भारतीय बनावटीचा कॅमेरा पाहून त्या माणसाने मला विचारले, ' यु हॅव कम बॅक.' त्याने मला ओळखले होते तर ! मी मानेनेच ' यस ' म्हणालो,

' सर धिस इज अँन इंडियन कॅमेरा ' मी कॅमेरासंबंधी अगोदरच खुलासा केला.

' आय नो दॅट.' तो ऑफिसर म्हणाला, ' अॅन्ड आय नो यु ऑल्सो, यु आर गोले. यू वेन्ट टू काटमांडू फॉर दर्शन ... नो ?'

' यस.' मी म्हणालो.

यू आर गुड पिपल. आय डोन्ट वॉन्ट टू सर्च एनिथिंग. यू कॅन गो.'

' थँक यू.' मी म्हणालो अन माझी बॅग घेऊन कस्टमसच्या बाहेर आलो. सौ.ही माझ्या मागोमाग आली. आता भुकेने पोटात कावळे ओरडत होते. आम्ही एक रिक्षावाला ठरवला अन एखादया बऱ्यापैकी हॉटेलात घेऊन जाण्याविषयी त्याला सूचना दिली. एरोड्रोम ते पाटणा शहर बरेच अंतर होते. रिक्शावाला (सायकल रिक्शा) आम्हाला ओढूनओढून दमला होता. ठरल्याप्रमाणे त्याला पैसे देऊन आम्ही एका हॉटेलात पोचलो व पोटभर जेवण करून विश्रांती घेतली, तेव्हा संध्याकाळचे पाच वाजले होते.

९।० २१५०१२-४

REFBK-0021600
REFBK-0021600